
डिजीटल आवृत्ती
मासिक
शिक्षण यात्री
▪ वर्ष:५ वे ▪ अंक: ७ वा ▪ जुलै २०२० ▪ किंमत:४० रूपये
OFF शिक्षण
शिक्षण ON

# पहिली ते आठवी इयत्तांच्या शिक्षणासाठी दुरदर्शन महामालिका

# ''टिली-मिली''

**२० जुलै २०२० पासून सह्याद्री वाहीनीवर**

प्रत्येक इयत्तेचा एका विषयाचा एक पाठ
६० पाठ ६० दिवसात ६० एपिसोड
सोमवार ते शनिवार ६ दिवस


## मालिकेचे वेळापत्रक

| वेळ | इयत्ता |
|---|---|
| सकाळी ७.३० ते ८.०० | आठवी |
| सकाळी ८.०० ते ८.३० | सातवी |
| सकाळी ९.०० ते ९.३० | सहावी |
| सकाळी ९.३० ते १०.०० | पाचवी |
| सकाळी १०.०० ते १०.३० | चौथी |
| सकाळी १०.३० ते ११.०० | तिसरी |
| सकाळी ११.३० ते दुपारी १२ | दुसरी |
| सकाळी १२ ते १२.३० | पहिली |

दि.२० जुलै ते २६ सप्टेंबर २०२० (रविवार वगळून )

टिलीमिली मालिकेच्या प्रकल्पात प्रयोगशील शिक्षणात भरीव कार्य केलेल्या 'ग्राममंगल' आणि इतर नामांकित संस्था, तज्ज्ञांचा सक्रिय सहभाग आहे. मालिकेत विद्यार्थ्यांना स्वच्छ, आनंदी वातावरण, भावनिक सुरक्षितता असेल. चुका करत स्वत:ची अर्थ बांधणी स्वत:च करण्याचे स्वातंत्र्य दिलेले असेल. असे केल्याने मुले हसतखेळत स्वत:च कशी शिकतात, हे मालिकेच्या प्रत्येक भागात बघायला मिळेल. अशी सहज, आनंददायक व ज्ञानरचनावादी प्रक्रिया उलगडत राहिल्याने मुलांना ही मालिका रोज स्वत: शिकण्याची स्फूर्ती देईल, त्यांचा आत्मविश्वास वाढवेल. कृतिनिष्ठ शिक्षणामुळे पालकही त्यात सहभागी होऊ शकतील. मराठी माध्यमाव्यतिरिक्त मराठी समजणाऱ्या इतर माध्यमांच्या विद्यार्थ्यांनाही ही मालिका उपयुक्त ठरेल. मालिकेचे आठही इयत्तांचे मिळून ४८० भाग २० जुलै ते २६ सप्टेंबर कालावधीत प्रसारित केले जातील.

MKCL Knowledge Foundation
Transforming Lives



**विवेक सावंत**
अध्यक्ष
एमकेसीएल नॉलेज फाऊंडेशन

**वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक**

▸ वर्ष : ५ वे

▸ अंक:७ वा ▸ जुलै २०२०

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

**• मार्गदर्शक •**

**मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)**

**• मानद संपादक •**

**सुभाषदादा कुलकर्णी**

**• कार्य.संपादक •**

**संदेश नंदकिशोर हजारे**

**• संपादन सहाय्य •**

**प्रा.डॉ.माधव कदम**

**युवराज माने**

**• प्रतिनिधी सहाय्य •**

**पुणे-** रमेश काळे, **मुंबई-** जयपाल गिरासे, **नाशिक-**किरण पाटील, **सोलापूर-** उमेश काळे, **औरंगाबाद-** रवि गारूडकर, **परभणी-** युवराज माने, **जळगांव-** प्रविण माळी, **नंदुरबार-** तुकाराम धनगर, **अमरावती-** रूपेश माने, **कोल्हापूर -** गुलाब बिसेन,**सातारा -** विनोद भोजने, **बीड -** अनंत दिक्षित, **लातूर -** पंढरीनाथ चिभडे,

**• अंक मांडणी •**

**प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे**

- लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
- पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील
- सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत

# अंतरंग...

३ विद्यार्थ्यांनो ! नव्या बदलासाठी तयार व्हा !

५ सृजनांचा आनंद देणाऱ्या लीलाताई...

८ सत्यनिष्ठा आणि सत्याग्रहाची वृत्ती...

१० शहराला पाठ, गावाकडची वाट !

११ गुरूजी,आता कोयता नको, लेखणी हवी !

१५ धारणेवर काम करणे महत्त्वाचे

१७ मोबाईल करा पालक नियंत्रित !

१८ वटवाघूळ...

२२ शहाणे व्हा...!

२४ महुची फुले...

**मासिका विषयी ...**

जून २०२०

नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226

वर्गणी : वार्षिक ₹ ५००, द्विवार्षिक ₹ १०००, त्रैवार्षिक १५००,

संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.

चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com

# संवादकीय

## ऑन-ऑफ 'शिक्षण'

शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे शेवटचे दिवस पर्व.मार्च परिक्षा आटोपून सुट्या लागणार. विद्यार्थ्यांबरोबर सारेच खुश. सुटीचे नियोजन झालेले. आणि अचानकच 'कोरोनाची'ची आपत्ती आलेली. सारे ठप्प. जागच्याजागी. लॉकडाऊन या शब्दाशी कधी संबध आला नाही. तो 'लॉकडाऊन' शब्द आज पुन्हापुन्हा कानात आदळू लागला. साऱ्या व्यवहाराला जागीच थांबवतांना शिक्षण क्षेत्रालाही जबर धक्का बसला मात्र जुन जुलै-ऑगस्टमध्ये सारे सुरळीत होईल ही आशाही मनात होती. परंतू...

शैक्षणिक वर्ष २०-२१ चा जुलै सरता झाला. एव्हाना नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात धामधुमीत झाली असती. शाळा शुभारंभ झाले असते. नवीन पुस्तके, नवीन गणवेश, वह्या दप्तरे सारे नवीन. मुले आनंदाने शाळेत आली असती. सजवलेल्या वर्गात गोंधळ झाला असता. शिक्षक उत्साहात शिकवू लागले असते. शाळेचे वातावरण पार खुशीत राहिले असते. नवीन अभ्यास सुरू झाला असता. शिरस्त्याप्रमाणे ऑफलाईन शिक्षणाचा श्वास मोकळ्या वातावरणात घेतला असता.

पण या आनंदाला २०२०-२१ हे वर्ष मुकले. कोरोनाच्या विळख्यात घट्ट सापडले. जून गेला, जुलै संपत आला तरी शाळांचं काय करायचं हे ठरवता येत नाही. संसर्गाचा वेग पाहिला तर शाळा उघडण्याची शक्यता धूसरच. मग शैक्षणिक वर्ष वाया जातेय की काय? याच भितीपोटी शिक्षण ऑन-ऑफच्या लाईनवर येऊन उभे आहे.

नेहमीची शिक्षणपध्दती म्हणजेच 'ऑफलाईनचा' सराव आपणा सगळ्यांना आहेच. चार बुकं वाचली, अभ्यासली म्हणजे शिक्षण झाले असे नाही तर ही त्याचबरोबर जीवनासाठी आवश्यक कौशल्याची गरज शाळेत, समाजात भागते.

अभ्यास करता खेळणं, नाचणं, कार्यक्रमात सहभाग घेणं, सहशालेय उपक्रमात भाग घेणं. यातून बरंच काही मुल शिकतात. प्रेम आपुलकी जिव्हाळा याबरोबर अनेक मुल्यांचा विकास शालेय वातावरणात होण्यास मदत होते.

मात्र शाळाच बंद मग करणार काय? शिक्षण तर सुरू असायला नको का? मग ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग दिसू लागला. मुलांना घरी बसुन अभ्यासाची सोय होऊ लागली. मोबाईल याच एकतर्फी मार्गाने जाणे गरजेचे बनले. ऑनलाईनचे सारे मार्ग कसे व कोणते याचा धुंडोळा सुरू झाला? रेडीओ चॅनेल, युट्युब चॅनेल, विविध अप्स, झुम-गुगल मीट, व्हीडीओ-ऑडीओ अशा मिळेल त्या मार्गाने मुलांना शिकवू लागले.

काही तंत्रस्नेही शिक्षक सोडले तर इतर शिक्षकांना या ऑनलाईन शिक्षण मार्गाचे जुजबी ज्ञान होते. तेंव्हा शिक्षकांना गुगल प्लॅटफार्मवरून प्रशिक्षण देऊन 'गुगल क्लासरूम' सुरू होणार आहेत. मोबाईल पेक्षा घरोघरी टिव्ही असल्याने एम.के.सी.एल. च्या पुढाकाराने टिलीमिली च्या माध्यमातून शिक्षणा ची संधी मिळणार आहे. दुरदर्शन वाहिनीवरून विविध कार्यक्रम प्रसारित होणार आहेत. गोष्टी ऐकण्यासाठी मिस कॉल द्यावा लागणार आहे.

एकंदरीत कोरोनाला लढा देत असतांना शिक्षण क्षेत्राची वाटचाल सुरू ठेवण्याचे सर्वतोपरी प्रयत्न चहुबाजूंनी सुरू आहेत. ऑनलाईन शिक्षणाच्या मर्यादा स्पष्ट दिसताहेत. समस्या देखील आहेत. राज्यात काही ठिकाणी ऑफलाईन शाळा सुरू केल्यात, स्वयंसेवक नेमलेत, मुलांचे गट तयार करून घरीच अभ्यास घेतला जातोय, ऑनलाईन शिक्षण ऑफलाईन शिक्षण या दोघांनी हातात हात घालून असंच चालावं. यामुळे आहे रे व नाही रे या घटकांना समानतेचा भास होईल. नाहीतर ऑन-लाईनच्या लाईनबरच विद्यार्थी उभा राहुन शिकण्याची कसरत करेल.

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.

सामोरे जातांना...



डॉ.विजय पांढरीपांडे
हैदराबाद
७६५९०८४५५५

# विद्यार्थ्यांनो ! नव्या बदलासाठी तयार व्हा!

कोरोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीनंतर शिक्षणाचा, अध्ययनाचा, एकुणच करीयर संबंधीचा अर्थ काही प्रमाणात बदलणार आहे हे आता विद्यार्थ्यांनी वेळीच लक्षात घेणे गरजेचे आहे. शालेय शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, पदव्युत्तर शिक्षण अशा सर्वच बाबतीत शैक्षणिक कॅलेंडर पूर्णपणे बदलले असणार. मास्क घालणे, सातत्याने हात धुणे, शारीरिक अंतर राखणे ह्या सवयी फक्त लॉकडाऊन पुरत्याच मर्यादित राहणार नाहीत. काही काळापुरत्या कां होईना त्या आपल्या जीवनाचा अत्यावश्यक भाग झालेल्या असतील. मास्क हा पोषाखाचाच एक भाग असेल साहजिकच ह्यामुळे वर्गात दाटीवाटीने बसणे, प्रयोगशाळेत शेजारी एकत्र उभे राहून मिळून प्रयोग अशा कृतीवर बंधने येतील. ट्यशून्स क्लासवर देखील मर्यादा येतील. त्यामुळे आतापासुनच विद्यार्थ्यांनी ह्या सर्व गोष्टींसाठी तयार राहिले पाहिजे. बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, पालकांनी मानसिक तयारी केली पाहिजे.

नेमके कुठे काय बदल होतील, करावे लागतील ह्याचा टप्पा टप्प्याने विचार करू.

एक तर शिक्षण म्हणजे शिकवणे ही संकल्पना बदलून शिक्षण म्हणजे शिकणे ही संकल्पना स्वीकारावी लागेल. टीचिंगवर भर कमी अन लर्निगवर फोकस जास्त हा महत्त्वपूर्ण बदल स्वीकारावा लागेल. आपल्याकडे बहुतेक विद्यार्थ्यांना हे स्पून फिडिंग पध्दतीचे असते. त्या ऐवजी विद्यार्थ्यांनी स्वत: वाचून चिंतन मनन करून, अभ्यास करावा लागेल. ह्या पध्दतीत सगळेच काही पहिल्या वाचनात समजेल अशी अपेक्षा नाही. उत्तम पुस्तकात विषय हा स्टेप बाय स्टेप समजावला असतो. गणिताची प्रमेयं पायरी पायरीने सोडविली असतात. विज्ञानाच्या संकल्पना देखील विश्लेषण करून, त्यांचे भाग करून समजावल्या असतात. ज्या गोष्टी समजल्या नाहीत त्यावर प्रश्न शंका लिहून काढाव्यात. त्या एकत्रित पणे चर्चा कराव्यात. हुशार विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण ( ॲव्हेरेज ) विद्यार्थ्यांना मदत करावी. त्यासाठी दहा-दहा ( संख्या कमी जास्त करता येईल) विद्यार्थ्यांचे गट तयार करावेत. त्यांना परस्परांना सहकार्य करावे. आजकाल प्रत्येक वर्गासाठी, प्रत्येक विषयांसाठी ऑनलाईन कोर्सेस उपलब्ध आहे. खान ॲकेडेमी हे एक उत्तम उदाहरण. हे कोर्सेस शालेय विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयोगाचे आहेत. समजायला सोपे आहेत. आपण व्हाट्स ॲपवर/ ग्रुपवर/ सोशल मिडियावर जशी चर्चा करतो तशी विद्यार्थ्यांनी चर्चा करावी. शंका/प्रश्न विचारावेत. ज्यांना माहिती आहे ते उत्तर देतील. ह्या प्रोसेस मध्ये एकापेक्षा अधिक उत्तरे मिळतील हे जास्त महत्त्वाचे. आतापर्यंत आपण ठराविक प्रश्न अन् त्याची साचेबध्द, ठोकळेबध्द उत्तर ह्या पध्दतीने शिकलो, जे चुकीचे होते. ह्या नव्या पध्दतीने दृष्टीकोन विस्तारेल. एकाच प्रमेयाकडे, संकल्पनेकडे वेगवेगळ्या पध्दतीने बघण्याची सवय लागेल. निरंतर शिक्षणासाठी हे जास्त उपयोगाचे आहे शिक्षकाने मार्गदर्शकाची फॅसिलिटेटर ची भूमिका बजावायची आहे. त्या अध्ययन/प्रक्रियेवर नियंत्रण ठेवायचे आहे. संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण झालाच पाहिजे. हा दुराग्रह देखील कामाचा नाही. एकुण अभ्यासक्रमापैकी साठ टक्के जरी समजले, पूर्णपणे

आकलन झाले तरी पुरे. बाकीचे गौण नाही. ते पुढेमागे समजून घेता येईल. प्रत्येक गोष्ट ठराविक कालवधीतच आत्मसात केली पाहिजे असे नाही. तसेही कोणत्याही एकूण अभ्यासक्रमात (आजकाल) अवांतर फापट पसारा जास्त असतो. महत्त्वाचा भाग जास्तीत जास्त पन्नास टक्के असतो. 'आमचा अभ्यासक्रम (सिलॅबस) पूर्ण झाल हे प्राध्यापक वर्गाचे आवडते वाक्य असते– अभिमानाने सांगण्यासाठी! अभ्यासक्रम हा कधीच पूर्ण होत नसतो. शिक्षणाला नेहमीच वाव असतो.

ह्यानंतर मुल्यांकनाच्या/परीक्षाच्या पध्दती संकल्पना बदलाव्या लागतील. केंद्रीभूत परीक्षा आवश्यक तिथे आवश्यक त्या प्रमाणातच वापराव्या लागतील. आपली परिक्षा पद्धत ही विद्यार्थ्यांची बुद्धीमत्ता तपासत नाही त्याचे कौशल्य तपासत नाही.प्रोजेक्टस/ सेमिनार्स/ ग्रुपवर्क/ क्विज अशा विविध माध्यमातून विद्यार्थ्याचे कौशल्य तपासता येईल. सगळा भर तीन तासातील स्मरणशक्तीवर असतो. त्यामुळे नव्वद टक्के गुण मिळालेले विद्यार्थी पुढे चमकत नाहीत. त्यांना हुशार म्हणता येत नाही. ह्या उलट पासष्ट टक्के गुण मिळालेला विद्यार्थी चमकतो. त्याने स्वत:हून अभ्यास केला असेल, वेगळेपण जोपासले असेल, त्याच्यात जिज्ञासा असेल, त्याला प्रश्न पडत असतील तर तो वरचढ ठरतो. करीयर मध्ये पुढे चमकतो. मेरिट वाल्याला मागे टाकतो. हे सत्य आहे.



सध्याच्या लॉकडाऊनच्या काळात अन त्यानंतरही विद्यार्थ्यांना स्वावलंबी वृत्तीवर/ स्वयंशिक्षणावंर भर द्यावा. ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे. नवी कौशल्ये शिकून घ्यावी प्रत्येक गोष्टीचा कुठे ना कुठे, कधीना कधी उपयोग होतोच. त्यामुळे वाचन/अध्ययन हे आपल्याच ठराविक विषयापुरते मर्यादित न ठेवता, इतरही अवांतर वाचन करावे. ते आपल्या आवडीनुसार करावे ह्या काळात ''शेअरिंग अन् केअरिंगवर'' भर द्यावा म्हणजे तुम्ही जे काही चांगले वाचले, पाहिले, अभ्यासले त्याची माहिती इतरांना द्या. त्यांच्याही चर्चा करा. चर्चेतून समजूत वाढते. परिपक्वता येते. दुसऱ्याची मते, दुसऱ्याचे प्रश्न, शंका ह्यातून विषय पुढे नेता येतो. आपले सध्याचे शिक्षण, अध्ययन हे डबक्यासारखे बंदिस्त आहे. ते खळाळत्या प्रवाही नदीसारखे हवे. समुद्राच्या विशाल परीघाचा ध्यास घेणाऱ्या वाहत्या स्वच्छ, पारदर्शी नदीसारखे.

टर्मिनल परीक्षाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. दहावी नंतर काय, बारावी नंतर काय, पदवी परीक्षेनंतर काय, पुढच्या ॲडमिशनचे काय, करीयरचे काय, नोकरीचे काय.... हे प्रश्न स्वाभाविक आहेत. सद्य परिस्थितीत ह्या प्रश्नाची नेमकी उत्तरे कुणाकडेच नाहीत. संघ ही अभूतपूर्व अशी, न भूतो न भविष्यती स्वरूपाची आपत्कालीन इष्टापत्ती आहे. इष्टापत्ती शब्द मुद्दाम वापरलाय. कारण वाईटातून देखील चांगल घडू शकते. रात्रीच्या गर्भातच उदयाच्या पहाटेच्या उष:काल दडलेला असतो. त्यामुळे उगाच काळजी. करण्याने, खचून जाण्याने प्रश्न सुटणार नाहीत. प्रश्नांना धडक द्यावी लागेल, धैर्याने सामोरे जावे लागेल. परस्पर सामंजस्य वाढवावे लागेल. संपूर्ण समाजाला विश्वासाचे, श्रध्देचे, निष्ठेचे वातावरण निर्माण करावे लागेल.

प्रश्न जेव्हा जटिल असतात तेव्हा समस्येचे उत्तर देखील जटील असणार. गर्भगळित होऊन चालणार नाही. धैर्यधर व्हावे लागेल. सर्व प्रश्न यथावकाश, आपोआप सुटतील. काळजी नको.



हेरंब कुलकर्णी
अकोले जि.अहमदनगर
८२०८५८९११९५

# सृजनाचा आनंद देणाऱ्या लीलाताई ...

शिक्षण क्षेत्रात ज्ञानरचनावाद, प्रयोगशीलता हे शब्द आज बोलते जातात. मात्र लीलाताई पाटील यांनी ते ३५ वर्षापूर्वी उपयोगात आणले. त्यांनी मुलांना शिकण्यासाठी शाळेतल्या चार भिंतीच्या बाहेर नेलं आणि बाहेरच्या जगाला शाळेच्या आत आणलं. शेवटपर्यंत मुलांच्या आनंददायी शिक्षणासाठी झटणाऱ्या, मुलांशी जोडलेलं राहाण्याची तळमळ असणाऱ्या लीलाताईचं नुकतंच निधन झालं. पण त्यांनी केलेल्या सृजनशील, कृतिशील आणि आनंदी शिक्षणातील पायवाटेवर चालताना शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या कायमच स्मरणात राहातील.

लिलाताई पाटील. सृजनशील, प्रयोगशील आणि आनंददायी शिक्षणाचा पाया रचणाऱ्या, शेवटपर्यंत मुलांना शिकवण्यासाठी, त्यांच्याशी जोडलं जाण्यासाठीच्या तळमळ असलेल्या शिक्षिका. समृद्ध जगण्याची पायवाट लीलाताई आखून गेल्या. शिकणं हे चौकटबद्ध नसून ते मुक्त आनंद देणारं, खुलवणारं आणि फुलवणारं असतं याची जाणीव लीलाताईंनी शाळा, पालक, विद्यार्थी आणि व्यवस्थेला करून दिली.

लीलाताई शासकीय नोकरीतून निवृत्त झाल्यावर १९८६ ला त्यांनी 'सृजन आंनद विद्यालय' स्थापन केलं. अभ्यासक्रम पुस्तकी म्हणून अनेक जण तक्रार करीत राहातात. पण लीलाताईनी या पुस्तकी अभ्यासक्रमाला कृतीतल्या आनंदाची जोड दिली घटक उपक्रमातून शिकवला. मुलांना चौकस, चिकित्सक बनवलं.

शाळा समाजाशी जोडली. मुलांच्या प्रतिभेला चालना दिली. साधं झाडांच चित्रं काढलं तरी मुलं १२५ प्रश्न विचारतात आणि रुमाल दिला तर त्यापासून ६० वस्तू तयार करतात. आज ऑनलाइन शिक्षणाच तंत्रज्ञान,



शाळेच्या सुविधा यावरून शाळांच मुल्यमापन होत असतांना अतिशय छोटया जागेत अनुदान न घेता शाळा चालवून अनेक उपक्रम त्यांनी केले. सुविधांपैकी शिक्षक विद्यार्थ्यांमधील प्रेमसंबंध आणि उपक्रम हा शाळेचा आत्मा असतो हे त्यांनी दाखवून दिले. ज्ञानरचनावाद, प्रयोगशीलता हे शब्द आज बोलले जातात. मात्र लीलाबाईनी ते ३५ वर्षापूर्वी उपयोगात आणले. त्यांनी मुलांना शिकण्यासाठी शाळेतल्या चार भिंतीच्या बाहेर नेलं आणि बाहेरच्या जगाला शाळेच्या आत आणलं. वयाच्या ८० व्या वर्षी त्या शाळेच्या वर्गात जाऊन

शिकवत. त्यांच्यात ही ऊर्जा होती, कारण ८० व्या वर्षी नाटकात काम करणाऱ्या रवींद्रनाथ टागोरांशी त्यांच नातं होतं.

लीलाताईच्या शाळेच्या उपक्रमाची चर्चा करतांना जगभरातील शिक्षणविषयक प्रयोग, आकडेवारी, भारतातील विविध आयोग, टागोर गिजूभाईपासूनची परंपरा आणि त्या जोडीला मराठी साहित्य आणि वैचारिक साहित्य असं सगळं धुंडाळून लीलाताई शिक्षणात उतरल्या होत्या. त्यामुळे ते केवळ उपक्रमासाठी उपक्रम नव्हते तर त्यामागे विद्यार्थ्यांच्या वर्तनबदलाचं सुस्पष्ट आकलन होतं. त्यातून हे सारे उपक्रम आणि प्रयोग आले.

कोठारी आयोगानं 'देशातील प्रयोगशील शाळांकडे आपण प्रयोगाशाळा म्हणून बघायला हवं' असं म्हटलं होत. या शाळांमधून जे प्रयोग होतील. त्याचं सार्वत्रीकरण शासनानं करायला हवं. अशी जे.पी. नाईक यांची या अहवालात अपेक्षा होती. दुर्दैवानं शासनानं ती भुमिका स्वीकारली नाही. पण जे पी नाईक यांची प्रयोगशील शाळा या प्रयोगशाळा असाव्यात ही अपेक्षा मात्र पूर्णत: लीलाताईनी पूर्ण केली. त्यांच्या शाळेत त्यांनी जे प्रयोग केले ते प्रयोगशाळेत विजेचा शोध लावून सर्वत्र प्रकाश पाडावा असेच होते. त्या म्हणायच्या, 'लोकशाहीला अनुरूप नागरिक तयार करणं, हे शाळांचं काम.' त्यासाठी राज्यघटनेतील मूल्ये विविध उपक्रमांतून पोहचवणं, विचारी आणि प्रश्न विचारणारा नागरीक तयार करणं यास्तरावर  पोहोचवणं, विचारी प्रश्न विचारणारा नागरिक तयार करणं, यावर त्यांचा भर होता. पण कृष्णमूर्ती म्हणतात. 'आपली शिक्षणव्यवस्था 'हाऊ टू थिंक' शिकवत नाही तर व्हॉट टू. थिंक' शिकवते. मुलांच्या उत्सुकता अनेक प्रकारच्या असतात जसं-पाणी कस तयार होतं? घर हलत का नाही? माणूस उडू का शकत नाही? आपण पानासारखे का वाळत नाही? यासारखे कितीतरी मूलभूत प्रश्न मुलांचे असतात. ही जिज्ञासा आपण टिकवून ठेवू शकू का? पण शिक्षक क्रेनसारखी माहिती पुस्तकातून मेंदूत नेऊन टाकतात. जयंती-पुण्यतिथीची भाषणं आणि समीकरणांच्या चौकटीत मुलांना कोंबून बसवलं जातं. शिक्षण नावाच्या प्रक्रि येद्वारे मुलांमध्ये असलेलं कुतहूल निपटून काढलं जातं. त्यांच्या बोलण्यात-लिहिण्यात आलेली उद्‌गारचिन्ह, प्रश्नचिन्ह वाढत्या वयाबरोबर नाहीशी होतात उरतो फक्त पूर्णविराम आणि त्यालाच आपण शाळेची सवय म्हणतो. इयत्तांच्या पाट्या लावून शिक्षण कोंडलं जातं, हे शिक्षणाचं वास्तव होतं. आणि लीलाताईना यातच बदल हवा होता.

शिक्षकांसाठी उपक्रम

मुलांना शाळेत कृतिशील ठेवण्यासाठी लीलाताईंनी शिक्षकांसाठी काही विशेष उपक्रम सुचवले होते. जसे झाडं लावून संगोपन, खेळ शिकणं गोष्टी जमवून मुलांना सांगणं, आकाशदर्शन, पक्षिनिरीक्षण, वनस्पतींचा परिचय इतर भारतीय भाषेतील एखादं गाणं शिकणं, विविध दगड, लाकडे, पिसे, कविता, कोडी संकलन करण्याचा छंद जोपासणं, पाककृती शिकणं, एकांताची अनुभूती देणं, पाणी आणि वीजबचत करण्याचा अनुभव घेणं, झोपडपट्टीत मुलांना नेऊन त्या मुलांशी विद्यार्थ्यांनी मैत्री करणं, गाणे, नाच, जादु, व्यायामप्रकार, रांगोळी या गोष्टी मुलांना येण्यासाठी प्रयत्न करणं, मुलांना वाचनाची गोडी लावणं, प्रत्येक तासिकेत शिक्षकांनी किमान १५ प्रश्न विचारावेत. वर्गात सतत नाट्यीकरण घेणं, मुलांची उत्सुकता जागृत ठेवणं.

विद्यार्थी जसाजसा शिकत जाईल तसतसा त्या विषयाशी अधिक एकरूप, सामाजिक प्रश्नांची बांधील आणि वास्तवाचं प्रखर भान असणारा बनत गेला पाहिजे. ही त्यांची शिक्षणाकडून अपेक्षा होती. 'शिक्षण संस्थातील हजेरी आपण कायद्यानं सक्तीची करू शकतो: पण प्रत्येक शाळेत शिक्षणाच्या नावाखाली दिली जाणारी गोष्ट त्या नावाला साजेशी असेल हे पाहणं सोपं नाही' अस वाक्य

सांगून त्या म्हणतात. 'मुलं कंटाळवाण्या निरस शिक्षणाचे त्यांच्यावर होणारे वार लढाईतल्या योद्ध्यासारखे चुकवायचा प्रयत्न करतात. त्यामुळे शाळेतून अभ्यास करण्यामुळे शोधन, वाचन, निरीक्षण करणं, समजणं, थोडक्यात सांगणं, तर्क करणं, नकाशावाचन, क्र.म, संबंध शोधणं, थोडक्यात सांगणं, विस्तारांन सांगणं, विचार करून निर्णय घेता येणं अशी अनेक उद्दिष्ट व्यक्तिमत्वात यायला हवीत. ज्ञानेंद्रिय कमेंद्रिय यांच्यामार्फत पुस्तकातील माहिती ही अनुभवविश्वाचा भाग बनायला हवील.'

शाळेत काय काय घडायला हवं? हे सांगताना त्या म्हणत. 'शिकण्यातला आनंद, शिक्षकांच्या प्रेमाचा अनुभव, सामुहिक कामाची अनुभूती. छंद विकसनाची प्रेरणा, स्वत:च्या विविध गुणांचा शोध, प्रत्येक उत्कट आणि निरपेक्ष प्रेम करण्याची शक्ती समजून देणारी संस्था आणि उणिवांची जाणीव करून देणारं केंद्र इतक्या गोष्टी शाळेत व्हायला हव्यात.'

मुलांमधील वाढत्या हिंसेविषयी पालकांना त्या सांगत की, जे पालक मुलांना मारहाण करतात. त्यांचीच मुलं शाळेत मारामारी करतात. घराघरांत चालणारी आदळाआपट, मोठ्यानं ओरडंण, दंडुकेशाहीचा वापर, समाजात दिसणारे, कानावर पडणारे, वाचनात येणारे मारामारी, खून यासारखे प्रकार, मुलांची खेळणी म्हणून नानविध बंदुकीचा वापर, समजूतदार माणसांऐवजी आक्रमक व्यक्तीना प्रतिष्ठा, यातून मुलांपर्यंत हिंसा पोहोचते.

मुलांना शिक्षणातून आनंद आणि जगण्याचं कौशल्य मिळायला हवं, सोबतच ते देशाचे कृतिशील आणि जबाबदार नागरिक व्हावे. यासाठी शिकण्या-शिकवण्याचे विविध प्रयोग करणाऱ्या अशा या लीलाताई त्यांनी सृजनशील, कृतिशील आणि आनंदी शिक्षणातील पायवाट तयार केली. त्या पायवाटेचा महामार्ग आता शाळेशाळेतून दिसायला हवा. दारिद्र्य हिंसा, पर्यावरण अशा जगातल्या प्रत्येक प्रश्नाचं सक्षम उत्तर शोधायला शाळंच्या वर्गखोलीत मी मुलांना सक्षम बनवीन' ही त्यांची दृष्टी होती. त्या नजरेनं शिक्षणाकडे बघता आल्यास लीलाताईच्या प्रयत्नांचं खऱ्या अर्थानं सार्थक होईल!

( हेरंब कुलकर्णी हे शिक्षण अभ्यासक असून माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.)

# ऑन-ऑफ 'शिक्षण'

–संदेश नंदकिशोर हजारे

**परवा विदयार्थ्यांकडूंन संपर्क नंबर (विशेषत: व्हॉटस्‌ॲप नंबर) घेण्यासाठी फिरत असतांना आलेल्या अनुभवांनी ऑनलाईन शिक्षणापुढील खाचखळग्यांची जाणीव करून दिली.**

गाव तसे लहानच. आदिवासी गोर-गरीब घरातील मुलेच शाळेत दाखल. शाळा बंद असतांना ऑन लाईन शिक्षण देण्यासाठी घरोघरी जावून मुलांचे संपर्क नंबर मिळविण्याचा प्रयत्न आम्ही शिक्षकांनी केला. तेव्हा आढळले की, घरी बहुतांश महिलाच उपस्थित. पुरुष वर्ग कामानिमित्त बाहेर.ॲण्ड्रॉईड मोबाईल कर्त्या पुरूषाकडेच. तसेच घरटी एकच मोबाईल असण्याची शक्यता जास्त. असलाच तर फक्त बोलण्यापुरता एखादा साधा संच घरात उतरलेला. गावात फिरतांना एका घरातील मुलाला बोलावले. मोबाईल नंबर काय आहे? हे विचारताच तो घरात पळाला. आईला घेऊन बाहेर आला. हातात जिओ कंपनीचा मोबाईल. नंबर काय आहे? तर सांगता आला नाही. तेव्हा स्वत: मोबाईल हातात घेऊन माझाच नंबर डायल करू लागलो. लगेच बॅलेन्स नसल्याचा मेसेज आला. बॅलेन्स नाही का? हे विचारताच पालकांनी प्रश्नार्थक नजरेने आम्हा शिक्षकांकडे पाहिले.



# सत्यनिष्ठा आणि सत्याग्रहाची वृत्ती...

**नीला आपटे**
विनोबा आश्रम,गागोदे
९४०५९२४२२७.



आचार्य विनोबा भावे एक दूरदर्शी तत्त्ववेत्ता, शिक्षणतज्ज्ञ, क्रांतिकारक संत, वैश्विक मूल्ये जपणारे, अध्यात्मिक आणि तितकेच विज्ञाननिष्ठ, विरक्त जीवन जगणारे, एक ऋषीतुल्य माणूस. विनोबांच्या १२५व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने त्यांचा जीवन परिचय करून देणारी ही लेखांची मालिका.....

विनोबा म्हणतात की, ''शिक्षणातून विविध गुणांचा विकास व्हायला हवा. या गुणांमध्ये सत्यनिष्ठा हा सर्वात महत्वाचा गुण आहे. आपल्या शाळांमध्ये सत्यनिष्ठा निर्माण करण्याचा आपल्याला अधिकाधिक प्रयत्न करावला हवा. सर्वात त्याज्य गुण म्हणजे असत्य. ही कल्पना मुलांच्या मनात रूढ झाली पाहिजे. आपत्ती आली तरी सत्यावर कायम राहण्याची शक्ती जनतेत असली पाहिजे. हीच एक शक्ती आहे. जिच्यामुळे जगाचा हिंसेपासून बचाव होऊ शकतो. समाजातील समस्या सोडविण्यासाठी याच शक्तीचा उपयोग होतो. विद्यार्थ्यांमध्ये सत्याग्रहाची वृत्ती निर्माण करण्याची योजना आमच्या शिक्षणात असली पाहिजे. सामजिक शिक्षणात आणि शाळेतील शिक्षणात असली पाहिजे. सामाजिक शिक्षणात आणि शाळेतील शिक्षणात सत्याग्रहाचे व्यावहारिक शिक्षण दिले गेले पाहिजे.''

यामध्ये सत्यनिष्ठा आणि सत्याग्रह हे दोन शब्द महत्त्वाचे आहेत. त्यांचा अर्थ असा की, जे सत्य मला उमगलेले आहे त्यावर माझी निष्ठा असणे आणि मला जे सत्य पटलेले आहे, त्याला कितीही विरोध झाला तरी आपल्याला पटलेल्या सत्याचा आग्रह धरणे. म्हणजेच. सत्यावर निष्ठा आणि सत्याचा आग्रह. यासाठी आपल्याला उमगलेले सत्य हे प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध झालेले असावे लागेल. व्यक्तिप्रामाण्य आणि ग्रंथप्रामाण्य या पासून मुलांना दूर न्यावे लागेल. म्हणजेच, त्यांच्यामध्ये चिकित्सक विचार करण्याची वृत्ती व वैज्ञानिक दृष्टीकोन रूजवावा लागेल. एखादी गोष्ट आई-बाबा सांगतात म्हणून किंवा शिक्षक सांगतात म्हणून सत्य आहे यापेक्षा सत्यतेचा अनुभव मी स्वत: घेतला आहे. व त्या अनुभवातूनच हे सत्य मला उमगलेले आहे तेव्हाच सत्यनिष्ठा तयार होईल. यासाठी सत्याचा शोध घेण्याची वृत्तीही जोपासणे आवश्यक आहे.

महात्मा गांधीच्या आत्मचरित्राचे नाव 'माझे सत्याचे प्रयोग' असे आहे. लहान वयापासूनच जीवनातील सत्य त्यांना कसे कसे उमगत गेले आणि त्यांना उमगलेल्या सत्यावर त्यांची निष्ठा कशी दृढ गेली याचेच ते चित्रण आहे. ज्या महात्मा गांधीनी जन्मभर सत्याचा शोध घेतला, त्याच महात्मा गांधीनी भारतातील असहकार चळवळीचा पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली होती. गांधीजी प्रमाणेच विनोबाही जन्मभर विविध सत्याचा शोध घेत होते व उमगलेल्या सत्याचा आग्रह धरत होते. विनोबांचे हे गुण हेरले असल्यानेच गांधीजींनी विनोबांची निवड केली असावी . विनोबांचे

जीवन म्हणजेही गांधीजीप्रमाणेच सत्यशोधनाची जणू मालिकाच होती. सत्याचा शोध घेण्यासाठी विनोबा सतत स्वत:ला आणि इतरांना प्रश्न विचारत असायचे. स्वत:वर अनेक प्रयोग करून समजलेल्या सत्याला तपासून पाहायचे आणि सर्व अंगांनी तावून सुलाखून निझालेली गोष्टच अंतीम सत्य म्हणून स्वीकारायचे. स्वीकारायचे, निष्ठापूर्वक अंगीकारायचे आणि प्रतिकूलतेतही त्या सत्याचा आग्रह धरायचे. हीच वृत्ती प्रत्येक माणसात लहान वयापासून जोपासणे किती महत्त्वाचे आहे, हे विनोबांच्या जीवनाची उंची पाहिली की लक्षात येते. अगदी साध्या-साध्या गोष्टींमध्ये विनोबांची कृती आणि विचारांचे महत्त्व आणि त्यांच्या सत्याग्रहाची ताकद आपल्याला जाणवत राहते. अतिशय कठोर असे प्रयोग सर्वांवर करत त्यांनी स्वत:चे अस्तित्व, स्वत:चे समाजातील स्थान, सामाजिकता, वैश्विकता, मानवी मूल्ये यासंदर्भातील शाश्वत सत्यांचा शोध घेतला आहे.

माणसाची दैनंदिन मिळकत, मूलभूत गरजा, पोषण व आहार यासंबंधातील सत्य शोधण्यासाठी त्यांनी स्वत:वर आहारविषयक प्रयोग केले. तर अस्पृश्यता सामाजिक विषमता व श्रमप्रतिष्ठा यासंदर्भातील सत्य शोधण्यासाठी त्यांनी भंगीकाम करणे, हरिजन वस्तीत राहणे, सूतकताई-विणकाम-धान्य दळणे, अशा पद्धतीची कष्टाची कामं तासनूतास स्वत: करून पाहिली. विविध धर्मांनी दिलेल्या शिकवणी व त्यातील सत्य शोधण्यासाठी त्यांनी धर्मग्रंथ व प्राचीन साहित्याचे अविश्रांत अध्ययन केले.

जीवन जगत असताना ज्या गोष्टीशी आपला संबंध येतो, जी माहिती आपल्याला मिळते त्यांची सत्यासत्यता तपासून पाहणे, स्वत:च्या सद्सद्विवेक बुद्धीला पटणारी गोष्टी सत्य म्हणून स्वीकारणे व त्याच गोष्टीला निष्ठेने अंगीकार करणे, हे शालेय जीवनात खूप महत्त्वाचे आहे. आजच्या शैक्षणिक प्रक्रियांमध्ये डोकावून पाहिले तर, सत्याचा शोध घेणारी चिकित्सक कृती आणि सत्याचा पाठपुरावा करण्यास किंवा त्याचा आग्रह धरण्यासाठी आवश्यक असणारी निर्भयता या गोष्टी पुरेशा प्रमाणात मुलांना मिळत नाहीत, असे आपल्या लक्षात येते. खूप मोठ्या प्रमाणात ग्रंथप्रामाण्य व व्यक्तीप्रामाण्य जोपासले जाते. वेगवेगळ्या विषयांची पाठ्यपुस्तके असोत अथवा ज्ञान माहिती देणारी अन्य माध्यमे असोत त्यातून मिळणारी माहिती सत्य आहे का हे तपासून पाहण्याची मुभा व सवय ना शिक्षकांना असते, ना मुलांमध्ये विकसित होते. पाठ्यपुस्तकात आहे ते सत्यच आहे, या गृहितकावर शिक्षकांचे शिकविणे व शिक्षक सांगताहेत हे सत्यच आहे वा गृहितकावर मुलांचे शिकणे अवलंबून असते. त्यामुळेच इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील खोट्या माहितीवर ना कधी चर्चा होते, ना विज्ञानाचे नियम प्रत्यक्ष कसे काम करतात याची प्रयोगावरून तपासणी होते. बरेचदा मुलांना घरून करून आणण्यासाठी अवघड प्रकल्प दिले जातात. पालकच ते पूर्ण करून मुलांच्या नावे सादर करतात. व त्यावरूनच मुलांना गुण दिले जातात. परीक्षेत कॉपी करून चांगले मार्क मिळवणे किंवा मुलांना उत्तीर्ण करण्यासाठी शिक्षकांनी प्रश्नांची उत्तरे सांगून लिहून देणे,शाळा तपासणीसाठी अधिकारी आले असताना अपेक्षित प्रश्नांची उत्तरे पढवून घेणे व सादरीकरणात दिखाऊपणा आणणे, असे खोटेपणाचे अनुभव देणाऱ्या गोष्टी पूर्णपणे बंद झाल्या पाहिजेत. समाजात सत्यनिष्ठा व सत्याग्रही वृत्ती बाळगणाऱ्या माणसांना प्रतिष्ठा आहे, सत्याने वागल्याने रूढार्थाने तोटा होत असला तरी सत्याची काम धरल्याने आत्मसन्मान मिळतो. याचा अनुभव शालेय जीवनात मुलांना आला पाहिजे. सत्यनिष्ठ वृत्तीच प्रामाणिकपणे जीवन जगण्याचे व निर्धारपूर्वक विविध क्षेत्रामध्ये सत्याचा आग्रह धरत ठाम भूमिका घेण्याचे बळ व हिम्मत आपल्याला देत असते. समाज जीवन जर सुदृढ व निरोगी ठेवायचे असेल तर प्रत्येक व्यक्तीला सत्यनिष्ठ सत्याग्रही बनले पाहिले व तसे करण्याची सुरूवात शालेय जीवनातच व्हायला पाहिजे.

कोरानाशी लढतांना



**शिल्पा प्रसन्न जैन**
एम.एस्सी.(संख्याशास्त्र) शिरपूर जि.धुळे
९०७५५९५९३९

# शहराला पाठ, गावाकडची वाट... !

जवळपास शंभर दिवस झाले आपण घर सोडून कुठेच गेलो नाहीत. मार्च महिन्याची रात्र. झोपेतून उठले ते वेगळ्याच विश्वात. आपण आपल्याच घरात बंदीस्त. ऐकायला, सोसायला खूप त्रास झाला.ह्या लॉकडाऊन मुळे अचानकच आपल्या आयुष्यात अनेक बदल घडले. ज्या गोष्टीला आपण तुच्छ समजत होतो त्या आयुष्यात किती महत्त्वाच्या आहेत हे कळले. परिवार, कुटूंब, एकमेकांविषयी काळजी कळाली. हस्तांदोलन करणे, गळाभेट घेणे अचानक शस्त्रांमध्ये वाटू लागले. आपली क्षमता, सौंदर्य, पैसा हे सारे काही कवडीमोल आहे याची जाणीव झाली. आपल्या आरोग्यासाठी जे काय आवश्यक आहे यांपैकी कुठलीच गोष्ट आपल्याला मिळवून देऊ शकत नाही. पैसे कमावण्याच्या शर्यतीत लागलेल्या या जगाला लॉकडाऊनने जगायला शिकविले. इतरांसाठी अन्नछत्र उभारणे,अन्नदान करणे, मदत करणे अशा अनेक मानवतावादी गोष्टी घडू लागल्या. माणूस माणूस म्हणून जगायला लागला ही भावनाच खूप सुंदर आहे.

लॉकडॉऊनने माणसाला पिंजऱ्यात अडकविले व त्याला विचार करण्यास भाग पाडले. ही पृथ्वी हे आकाश, हे पाणी, संपूर्ण निसर्ग तुझ्याशिवाय अगदी मजेत आहे. परंतू तू त्यांच्याशिवाय शून्य आहेस. जणू हा संपूर्ण निसर्ग आपल्याला सांगु इच्छीत आहे की तू इथे फक्त पाहुणा आहे, स्वतःला मालक समजण्याची चूक करू नकोस.

लॉक डाऊनमुळे अनेक चांगल्या गोष्टी घडल्या मान्य आहेत. परंतु कुठलीही घटना घडते तेव्हा तिच्यासोबत तिचे चांगले वाईट परिणाम घेऊन येते जसे समुद्रमंथन केले होते अमृतासाठी परंतू त्यातून विष देखील निघाले. तसेच लॉकडाऊनच्या ह्या कालावधीत अनेक नकारार्थी गोष्टी देखील घडल्या जसे अनेक गरोदर स्त्रीयांना ज्यांच्या गावात दवाखाने नाहीत. डिलेव्हरीसाठी एका गावातून दुसऱ्या गावी जातांना रस्त्यातच त्रास सहन करावा लागला. अनेक मजुरांना काम न मिळाल्याने गावाकडे परततांना असह्य गोष्टींना सामोरे जावे, अनेकांचे गावाकडे परततांना मृत्यू देखील झाले. सामाजिक परिस्थिती अतिशय बिकट झाली. देशाच्या आर्थिक व्यवस्थेला देखील जबर फटका बसला .

अनेक सवलती शासनाने देऊ केल्या परंतू त्या सामान्य माणसांपर्यंत पोहचल्या नाहीत. यात काहींनी फक्त स्वत:चा फायदा करण्यासाठी जिथे ५०००० मध्ये संपूर्ण उपचार घेऊ शकतात तिथे त्यांनी ५ लाख पर्यंत खर्च रुग्णांपासून घेत आहेत. प्रत्येक जण आपल्या तऱ्हेने पैसे काढू धोरण ठेवत आहे. नेते मोठाल्या गोष्टीवरून स्वत:चे हित साधण्याचा प्रयत्न करत आहेत.

मंदीरे ओस पडली आहेत त्यामुळे लोकांच्या धार्मिक भावना व विधीत अडसर आले ह्या सर्व गोष्टी घडत असतांना आपण प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीने बघणे महत्वाचे आहे. जितकी सकारात्मकता आपण ठेऊ, स्वत:ला ह्या सर्व समस्या व पुढे वाढणाऱ्या समस्यांनसाठी कसे तयार करू हे महत्वाचे आहे. मुलांचे शैक्षणिक नुकसान झाल्यामुळे फक्त ऑनलाईन शिक्षणावर भर न देता थोडावेळ मुलांना देऊन आपण त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

यात महत्वाचे ज्यांनी खरच समाजासाठी आपला अमुल्य वेळ खर्च केला स्वत:ला संकटात टाकूनही समाजाची सर्वथा सेवा केली अशा सर्व डॉक्टर्स, नर्स, पोलीस यांना लाख लाख धन्यवाद द्यावे. शेवटी एकच सांगू इच्छिते सुरक्षित राहा, घरी राहा. आपण सुरक्षित तर परिवार, समाज व हे राष्ट्र सुरक्षित. वेळ खराब आहे, जीवन नाही हे महत्त्वाचे.

आनंदाचे झाड...



युवराज माने
सेलू जि.परभणी
७५१७४७८५७०

# गुरूजी, आता कोयता नको, लेखणी हवी !

तुम्ही आलात म्हणूनच आमचे गुरुजी गेले.तुम्ही आला नसता तर आमचे गुरुजी आम्हाला सोडून गेले नसते... ही मनातील सल नेहाच्या तोंडून बाहेर पडली. पुढे अनेक दिवस ती सल वर्गात वेगवेगळ्या मार्गांनी समोर येऊ लागली. खरंतर या घटनेनंतर मी नाराज,दु:खी किंवा आपल्या मार्गावरून विचलित व्हायला हवं होतं.पण तसं काही झालं नाही.उलट मला मनापासून खूप आनंद व लेकरांबद्दल खूप अभिमान वाटू लागला.आपल्या गुरुजींवर प्रचंड प्रेम करणारी ही मुलं मला भेटली आहेत त्यामुळे आपणही किती भाग्यवान आहोत असं वाटू लागलं.

स्वत:ची नवनिर्माणाची पाऊलवाट तुडवत असताना या नव्या शाळेत या नव्या मुलांचे व गुरुजींच्या पावलांचे संवेदनशील ठसे मला पुढे अनेक पावलं चालण्याचे बळ देऊन गेले. 'मुले खोडकर असायलाच हवीत.कारण त्या वयात त्यांच्या ठिकाणी नवनव्या कल्पना असतात. त्यांच्या या कल्पनांना वेगवेगळ्या कृतीतून नवनिर्माणाची धुमारे फुटत असतात.याच वयात त्यांना प्रचंड प्राणशक्ती असते.तिखटपणा असतो आणि त्यांचा हा जोश कुठल्यातरी प्रकारे बाहेर पडला पाहिजे.अशा मुलांना अतिशय काळजीपूर्वक हाताळता आलं पाहिजे, त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात त्यांना प्रवाहित केलं पाहिजे.'असे अनेक अनुभव मागील बारा वर्षाच्या काळात मला आले होते.पुढील पंधरा दिवस शाळेतील मुलं,सहकारी बांधव,गावातील पालकांचा शाळेप्रतीचा संबंध, व शाळेतील वेगवेगळ्या उपक्रमाविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करू लागलो.शाळेतील मुलांबाबत इतर पहिल्या दोन दिवसातच मला उत्तम प्रचीती आली होती. जगातल्या कोणत्याही शाळेत तुम्ही जाल तर विद्यार्थ्यांची ही मनोभूमिका सर्वच ठिकाणी अशीच पाहायला मिळेल. विद्यार्थ्यांच्या भावना या फार तरल, निखळ असतात. त्यांच्या या भावनांचा सन्मान होऊन त्या योग्य दिशेने प्रवाहित करणारे गुरुजी मात्र लाभायला हवेत..

शाळेत नवीन गुरुजी रुजू झाले आहेत हे समजताच गावचं तरुण तडफदार व्यक्तिमत्व असलेले गावचे सरपंच माऊली राठोड व पोलीस पाटील साहेबराव राठोड इतर गावकऱ्यांसह शाळेत पोहोचले. सर्व विद्यार्थ्यांसमोर त्यांनी माझं स्वागत केलं. याप्रसंगी गावचे प्रथम नागरिक म्हणून माऊली राठोड यांनी माझ्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. मुलांप्रमाणेच गावच्या प्रथम नागरिकांने मला हा दिलेला अनपेक्षित धक्काच होय. आठ-दहा दिवसात शाळेत येताना या गावला साधा व्यवस्थित रस्ता नाही ,आपण उगाच या शाळेत आलो ,काय ही शाळेची दशा,असे अनेक विचार मनात घोंगावत असायचे परंतु गावचे प्रथम नागरिक व गुरुजींवर प्रेम करणारी मुलं हे माझ्यासाठी बलस्थान बनले. पुढील दीड महिना गावचे प्रथम नागरिक ना कुणी पालक शाळेकडे फिरकलं नाही... शाळेतील मुलांमध्ये अनेक हुन्नर मी पाहू लागलो. अतिशय काटक बांध्याचे,धष्टपुष्ट लेकरं. मातीत बी पडल्यास ते आजूबाजूचं जीवनरस शोषून जसं अंकुरित होतं तसं ही मुलं आपल्यातील प्रतिभा अंकुरित करण्यास सज्ज होते.वेळ होती फक्त जीवन रसाच्या प्रवाहाची.माझ्या वर्गातील मुलं आपल्या जुन्या गुरुजीसोबत माझी तुलना करण्यात गुंग असायचे. माझी

शिकविण्याची पद्धत, बोलण्याची पद्धत, एवढेच नाही तर माझ्या राहणीमानाची तुलना लेकरं आपल्या जुन्या गुरुजींशी करू लागले. यात मी कमी पडू लागलो. पण यातही मला मनातून खूप आनंद होत होता. कारण यातून मुलं तुलना करायला शिकत होते दोन व्यक्तिमत्त्वातील वेगवेगळे अंग तपासून पहात होते.दोन व्यक्तिमत्त्वातील गुणवैशिष्ट्ये लक्षात घेत होते.एखादा गुरुजी मुलांच्या मनावर किती अमिट ठसा उमटवतो याची जाणीव होऊ लागली. मुलंही आपल्या गुरुजींच्या आठवणी आपल्या मनाच्या कुपीत किती जपून ठेवतात याचा हेवाही वाटू लागला...

लहान मुलाला चित्र काढावेसे वाटले तर ते कोणत्या पद्धतीने चित्र काढावे?असा प्रश्न त्यांना पडत नाही. कारण त्यांचं चित्रकलेवर असलेलं प्रेमचं त्यांना चित्र सुचवते. शिक्षकाचे मुलावर प्रेम असेल तर आपोआप पद्धती निर्माण होत जातात.आपल्या जुन्या गुरुजींच्या आठवणीसह मला मुलांनी स्वीकारावं यासाठीच्या अनेक क्लृप्त्या मी वापरत होतो.अनेक पद्धती मला सुचत जात होत्या.हा प्रवास अतिशय मजेदार व भन्नाट सुरू होता... पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य. दिन दरवर्षीप्रमाणे या शाळेतही संपन्न झाला. यानिमित्ताने गावकऱ्यांचं देशप्रेम दिसून आलं. आपल्या कामातून वेळ काढून किमान आजच्या दिवशी तरी गावकरी शाळेत आले होते.शाळेतील नवीन गुरुजी यानिमित्ताने गावकऱ्यांना पाहायला मिळाले.नवीन गुरुजींची ओळख व्हावी म्हणून मला बोलण्याची संधी दिली.ही खऱ्या अर्थाने या ठिकाणी परिवर्तनाच्या अनेक बिया रुजविण्याची संधीच मला या निमित्ताने मिळाली होती.शाळेतील विद्यार्थी व गावकऱ्यांसमोर आपले मनोगत व्यक्त करण्याची ही या गावातील प्रथमच वेळ होती. मी मागील बारा वर्षाच्या कालावधीतील विद्यार्थी, शाळा व गावकरी यांच्या एकत्रित सुसंवादातून गावची शाळा कशी उभारली जाते व गावातील मुलांना गावातच उत्तम प्रतीचे शिक्षण कसं मिळतं याचे स्वानुभव मांडत होतो मुलं व गावकरी मन लावून ऐकत होते. आपल्या मुलांना जर गावातच उत्तम प्रतीचे शिक्षण मिळालं तर इतरत्र होणारे शोषण आपण थांबू शकतो. आणि शिक्षणाशिवाय पर्याय नाही हेही तितक्याच पोटतिडकीने मी सांगत असताना गावकऱ्यांना ते पटू लागलं. आता आपल्याही या गावात आपण अशीच एक उत्तम अशी शाळेची निर्मिती करू आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आपण स्वतः उभे राहू आम्ही सर्व शिक्षक तुमच्या मुलांसाठी धडपड करत आहोत फक्त ते तुम्हाला दिसत नाही.जर तुम्ही आमच्या सोबत आलात तर आपण सर्वजण मिळून हे उत्तम काम करूया. सहा-सहा महिने तुम्ही ऊस तोडी साठी इतरत्र भटकत असता;सोबत आपल्याही मुलांना घेऊन जाता.यातआपल्या स्वतःची व मुलांची खूप मोठी हानी आहे. येणाऱ्या पुढील काळात आपण आपली मुलं सोबत घेऊन न जाता आमच्यावर विश्वास ठेवून यांना इथेच गावी ठेवाल अशी अपेक्षाही मी गावकऱ्यांकडे व्यक्त केली. माझ्या मनातील विद्यार्थ्यां,शाळेप्रतीची नवनिर्माणाची भावना गावकऱ्यांच्या मनात मी पेरून दिली. माझं मनोगत संपताच माऊली राठोड व गावकरी यांचा माझ्या भोवती गराडा पडला. अनेकांनी मी केलेल्या आव्हानाला दुजोरा दिला व आपण सर्वजण नक्कीच करूयात असे शब्दही दिले.

गावकऱ्यांसोबत झालेला संवाद ही नवनिर्माणाची पालवी फोडणारा ठरेल असा आशावाद घेऊन मी नेहमीप्रमाणे कामाला लागलो. पण नेहमीप्रमाणेच गावकरी आपापल्या कामात गुंतले कुणीही फिरकलं नाही. आता वर्गातील मुलं माझ्याकडे वेगळ्या नजरेने पाहू लागले. मागील दोन शाळातील आठवणी मुलांनी माझ्या तोंडून ऐकल्या होत्या. एके दिवशी दुपारी जेवणाच्या सुट्टीत विचित्र प्रसंग पाहायला मिळाला शाळेतील स्वयंपाक घरात बनविल्या जाणाऱ्या पोषण आहारातील पातेल्यावर झाकल्या जाणाऱ्या झाकणावर पुष्कळसा भात-भाजी घेऊन चार- पाच मुलं

व्हरांड्यात जेवण करत होते. बाहेर भरपूर पाऊस सुरू होता मुलांच्या अवतीभोवती एक दोन कुत्रे बसलेली होती. माश्या घोंगावत होत्या हे चित्र पाहून मी विचलित झालो. मलाच माझी लाज वाटली.मला पाहताच मुलं उठून पळून गेली. पुढील दोन चार दिवस यावर मी सतत विचार करू लागलो मागील शाळेमधील मुलांना लावलेली शिस्त, शालेय वातावरण, गावकऱ्यांचे सहकार्य आपणास कसे मिळत गेलं.असे अनेक भूतकाळातील प्रसंग आठवू लागलो. आदिवासी नक्षलग्रस्त भागातील गावकरी आपल्या मुलांच्या भविष्यासाठी आम्हा गुरुजींसोबत उभे राहून गावातील शाळेचा विकास घडून आणला.आपला मराठवाडा तर यांच्यापेक्षा कितीतरी प्रगत आणि समृद्ध समजतो. तर मग येथीलही पालक आपल्याला नक्कीच मदत करतील असाही आशावाद मनात येऊ लागला. शिक्षक हा एक जागल्या असतो.समाजातील चांगलं-वाईट याची जाण शिक्षकाला असायलाच हवी. बालपणापासून मुलांवर योग्य संस्कार व्हावेत यासाठी त्याला सतत जागा राहावं लागतं किंबहुना जागं असायला हवं. गावाची मनोभूमिका समृद्ध करणारे ठिकाण म्हणजे शाळा! याच ठिकाणी मुलांवर उत्तम विचारांचे संस्कार झाले नाही तर असंवेदनशील समाज तयार होईल. अशा अनेक विचाराअंती मी व माऊली राठोड गावची शाळा व गाव विकास या विषयावर चिंतन करू लागलो .गावातील तरुण, धडपडा मुलगा गावासाठी काहीतरी करु इच्छितो.त्याचे स्वप्न साकार करू इच्छितो हे माऊली राठोड यांच्या बोलण्यातून लक्षात आलं. मागील बारा वर्षातील शाळा विकासातील अनेक प्रसंग माऊली राठोड यांच्या समोर ठेवले. आमच्या दीर्घ चिंतनातून शाळा व गाव विकासाप्रतीची भूमिका पुढे साकारत गेली. सतरा सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ध्वजारोहण प्रसंगी पुन्हा गावकरी एकत्रित आले त्यावेळी पुन्हा एकदा गावकऱ्यांना आम्ही शिक्षकांनी व मावली राठोड यांनी आव्हान केले. यावेळी मात्र गावकऱ्यांनी ठाम भूमिका घेऊन पाठीशी उभा राहण्याचा निर्णय घेतला आणि दुसऱ्याच दिवशी पन्नास पालकांना घेऊन महाराष्ट्रातील प्रेरणादायी शाळा भेटी घडवून आणल्या.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जरेवाडी या शाळेचा कायापालट करणारे मुख्याध्यापक संदीप पवार व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक बांधव आणि शिक्षकांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या गावकऱ्यांना भेटण्यास आमच्या गावचे काही गावकरी जरेवाडीतआलो होतो. संदीप पवार यांनी शाळेचा विकास व गावकऱ्यांचे सहकार्य याविषयी पालकांना मार्गदर्शन केले. ऐकणे आणि स्वतः पाहणे यात खूप फरक असतो. आज माझ्या गावकऱ्यांनी स्वतः च्या काणांनी ऐकलं व डोळ्यांनी पहिलं हे खूप बरं झालं. शिक्षण क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण करणारी ही शाळा आम्हा सर्वांना प्रेरणा देऊन गेली पारडी हे संपूर्ण बंजारा समाज असलेलं गाव. सहा-सहा महिने गावातील माणसं उसाच्या फडात काम करायलेले असतात.सोबत त्यांच्या मुलांचे शिक्षणही या उसाच्या फडात पाचटासारखं तुडवल्या जात असतं.अशाच ऊसतोड कामगारांचे औरंगाबाद जिल्ह्यातील वरवंडी तांडा एक गाव तेथील बंजारा समाजाचं हे पूर्ण गाव.तेथील बंजारा बांधवांनी आपल्या मुलांना स्वतःच्या गावात उत्तम शिक्षक मिळावं यासाठी एकत्रित येऊन शाळा विकासातप्रति घेतलेली भूमिका महाराष्ट्रभर चर्चेचा विषय होता ही शाळा दाखवणे तितकंच आवश्यक वाटू लागलं आणि त्याच दिवशी या पालकांना घेऊन मी वरवंडी येथे पोहचलो तांड्यातील शाळेत भरत काळे नावाचं धडपड व्यक्तिमत्व गावकऱ्याचं शाळेविषयीच प्रेम व दूरदृष्टीपणा आमच्या पालकांना सांगत होते गावातील प्रत्यक्ष नागरिकही आमच्या पालकांशी त्यांच्या मायबोलीतून बोलत होते.या तांड्यावरील बंजारा बांधव जर आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी अशी भूमिका घेऊ शकतात तर आपण का नाही घेणार अशी

प्रेरणा घेऊन आम्ही परत आलो. येत असतानाच आणखी एका जगदीश कुडे या अवलिया शिक्षकाची शाळा आम्हाला बोलवत होती. जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीराम तांडा या शाळेवरही आम्ही सर्वजण पोहोचलो ही पण ऊसतोड कामगारांचे गाव याही ठिकाणी बंजारा बांधवांनी शाळेला केलेले सहकार्य,आणि गावातील लोकानी दिलेला विश्वास आमच्या पुढील कार्यात खुप मोठी उपलब्धी ठरली. श्रीरामतांडा या शाळेतील परिसरात मांडलेल्या बेंचवर आमच्या गावातील पन्नास नागरिकांची व तांडा येथील नागरिकांची जणूकाही शाळा भरली. गुरुजी होते तेथील गावकरी वर शाळेतील मुलं . याच ठिकाणी गावातील अनेक नागरिकांनी शाळा विकासाची मूठ बांधली गावचे प्रथम नागरिक माऊली राठोड यांनी व गावकऱ्यांनी आपल्या मनातील थांब भावना व्यक्त केल्या की,गुरुजी आता आमच्या मुलांच्या हातात कोयता नको तर लेखणी हवी..... तांड्यावरील मुलांसाठी अशी मोठी उदात्त भावना घेऊन आम्ही परतू लागलो त्यावेळी प्रवीण दवणे या लोकशिक्षकाचे विधान मला आठवले..'जो शिक्षक शिक्षणातील ही आव्हानं झेलूनही स्वतःला वेगळ्या प्रकारे सिद्ध करून दाखवू इच्छित असेल,तर त्याला संधी मिळू शकते पण आपली ऊर्मी मात्र तेवढी सबल हवी. कुणीतरी थांबवल्याने- थांबतो तो धबधबा कसला? थांबणाऱ्यालाही जो बरोबर घेऊन वाहतो तो धबधबा!

आजच्या शिक्षणाच्या मर्यादेतही शिक्षक व शिक्षण व्यवस्थेला एक स्वातंत्र्याचा अवकाश आहे. त्या अवकाशाचा उपयोग शिक्षण आणि संवेदनशीलता व मानवी मूल्ये रुजवायला करायला हवा.... ही माझ्यासह अनेक शिक्षकांना संधी आहे. ग्रामीण भागातील माझ्या या लेकरांना आहे त्या ठिकाणी, आहे त्या उपलब्ध साधनसाहित्यसह आपण उत्तम शिक्षण देऊ शकतो ही भूमिका गुरुजी व गावकऱ्यांनी घेतल्यास शिक्षण फुलतं...बहरतं...

**(युवराज माने हे प्राथमिक शिक्षक असून जि.प्रा.शाळा पारडी ता.सेलू जि.परभणी येथे कार्यरत आहेत. )**

# ऑन-ऑफ 'शिक्षण'

–संदेश नंदकिशोर हजारे

**शाळा बंद शिक्षण सुरू यासाठी मुलांनी दिक्षा ॲप डाऊनलोड करावे किंवा व्हॉटसॲपच्या माध्यमातून अभ्यास द्यावा, जेणेकरून मुलांचा थोडा तरी अभ्यास होईल. हा प्रयत्न करण्यासाठी पालकांचे वेळोवेळी बदलणारे संपर्क नंबर नेमके शोधण्यासाठी गावातून फेरफटका सुरू केला. तेव्हा ऑनलाईन शिक्षणात येणारी प्रमुख अडचण दोन बहिणींच्या निमित्ताने पुढे आली. दोन सारख्या चुलत बहिणी. एक तिसरीत तर दुसरी चौथी. रहायला एकाच घरात. मोबाईल नंबर घेण्यासाठी त्यांचेकडे गेलो. घरात तिच्या वडिलांकडे मोबाईल नाही. काकांकडे आहे. ॲन्ड्राईड असला पाहिजे. काका कामाला गेलेले. घरातल्या महिलांना नंबर सांगता आला नाही. एका बँकेच्या पुस्तकावरून शोधून दिला. त्यावर फोन करून वॉटसॲप चालू आहे का विचारलं. तर त्यांनी महिनाभरापुर्वीच चालू केले असल्याचे सांगितले. व्हॉटस्ॲप रोज पहात चला व दिलेला अभ्यास घ्या. हे सांगताच त्यांनी घरातील इतर सात जणांचा अभ्यास याच मोबाईलवर पाठवला जातो. त्यांचे व्हॉटसॲप ग्रुप आहेत. चिंता कसली करता. मी सगळ्यांचा (नऊ जणांचा) अभ्यास घेईन हे सांगताच आम्ही चकित झालो. एक मोबाईल. तोही दिवसभर बाहेर आणि त्यावर नऊ भावंडाचा अभ्यास.....**

मूल समजून घेतांना



**विनायक सावळे**
शहादा,जि.नंदुरबार
८७८८२७३२८३

# धारणेवर काम करणे महत्त्वाचे

ही गोष्ट आहे साधारणपणे १७-१८वर्षांपूर्वी ची. मी जिल्हा परिषदेच्या शाळेत रुजू होऊन तिनेक वर्ष झाली होती.उत्साहाने काम करीत होतो. अर्थात आजही तोच उत्साह आहे.मग त्यात शाळेत न येणाऱ्या मुलांकडे जाणं, त्यांच्या पालकांच्या भेटी घेणं, त्यांना शिक्षणाचं महत्व समजावून सांगणं, त्याचं महत्व न कळणाऱ्या पालकांची हजेरी घेणं,त्यांच्यावरही चिडणं असं नियमितपणे घडायचं.

राजेश नावाचा मुलगा गेले महिनाभर अतिशय अनियमित होता. मुलगा चौथ्या वर्गाला.शाळेत आल्यावर शिक्षणाचं महत्व वगैरे मी खूप समजावून सांगितलेलं....पण हा अधूनमधून दांडी मारतच असे.

त्या दिवशी तो पुन्हा गैरहजर. शाळा तपासणी साठी साहेब आलेले.अशावेळी वर्गात सर्वच विद्यार्थी हजर असणे किंवा अधिकाधिक विदयार्थी असणे महत्त्वाचे. राजेश आजही नव्हता आला.

माझ्या मनात बरंच काही सुरू झालं....हा राजेश आपल्याला असंच तोंडघशी पाडणार, शिक्षणाचं महत्व कसं नाही कळत याला?काय करायचं याचं?याच्या आईवडलांना इतकीही समज(तेव्हा डोक्यात आलेला शब्द 'अक्कल'.) नाही का? चला,जाऊन येऊ आज त्याच्या घरी, आणि चांगलीच खरडपट्टी काढू त्यांचीही.

मग मी शाळा सुटल्यावर तसाच तावातावात निघालो. डोक्यात गैरहजर राहिलेला राजेश, त्याच्या शिक्षणाबाबत निष्काळजी असलेले त्याचे आईवडील, यांच्याबाबत संताप होता. काय काय बोलायचं ते आधीच मनात बोलतच होतो...... काही सुधारणार नाहीत ही लोकं,असा त्या मनातल्या बोलण्याचा शेवट असायचा.

गावात पोहोचलो, राजेश च घर आलं.अत्यंत मोडकळीस आलेली झोपडी.काड्याची बनवलेली. मी बाहेरूनच हाका मारल्या, माझ्या आवाजात ओरडा होता..

राजेश, कुठंय..??बाहेर निघ..?शाळेत का नाही आला तो आज..??

माझा आवाज ऐकून त्याची मोठी बहीण बाहेर आली.

सर ,तो घरी नाहीये,म्हणाली.

बहुतेक हा बाहेर उंडारत असेल असे मला वाटले.

अरे..! कुठे गेला..?,तुझ्या आईवडलांना बोलावं. मी चिडून म्हणालो.

सर, आईवडील घरात आहेत,तुम्ही या ना घरात,ती मुलगी म्हणाली.

मी तसाच तावातावात झोपडीत शिरलो.

काय होत तिथं.....

खाटेवर राजेश चे वडील गेले काही दिवस मरणासन्न अवस्थेत पडले होते.दारूच्या व्यसनाने त्याचं शरीर पूर्ण पोखरलेलं होतं. पिंजरा झालेलं शरीर, खोल गेलेले डोळे, दाढी वगैरे वाढलेली, हातापायांच्या मंद हालचाली.... आणि त्या खाटेशेजारी राजेश ची आई खिन्न मनाने बसली होती.

ती हळुवार बोलू लागली.

सर, राजेश शेतात कामाला गेलाय, मी ही कामालाच जाते. सध्या ह्यांची तब्बेत खूपच खालावलेली, म्हणून घरीच आहे.राजेश च्या कामावर घर चालते. माझा गुणी मुलगा, मला मदत करतोय.

अजून काही दिवस तो शाळेत नाही येणार. त्याच्या वडलांची तब्बेत बरी झाली की पाठवीन त्याला....हे शेवटचं वाक्य बोलताना तिला रडू कोसळलं. कारण ते वाक्य खरं नव्हतं हे तिलाही कळत होतं. तिचा नवरा आता बरा होणार नव्हता. आणि राजेश,एक १०-११ वर्षाचा मुलगा काम करून घर चालवण्यासाठी आईला मदत करीत होता.

त्याक्षणी मला काय वाटलं असेल याची तुम्ही कल्पना करू शकता का?

मला माझीच लाज वाटू लागली.राजेश आणि त्याच्या आईवडिलांच्या साठी मी मनात बरीच शेरेबाजी केली होती. तिच्या अश्रूंनी ते सगळं धुवून निघालं.... माझ्या विचार करण्यात मूलभूत फरक पडला. मला घटनेची वेगळी बाजू समजली.

ज्या राजेशचा राग यायचा तो माझ्या दृष्टीने आता अकालीच घराची जबाबदारी पेलणारा कर्तृत्ववान मुलगा झाला, बेजबाबदार आईवडील मला परिस्थिती तिने बेजार झालेले, दु:खी आणि निराश असलेले,त्यांच्याबद्दल मला सहानुभूती वाटू लागली.माझी नजरच बदलली. अचानक या गोष्टीकडे मी वेगळ्या नजरेने बघू लागलो.आणि मी वेगळ्या दृष्टीने पाहिलं म्हणून माझे विचार वेगळे झाले. मला वेगळं वाटू लागलं. मी वेगळं वागायला लागलो. माझा त्रास पळून गेला,त्रागा संपला.

तुम्ही यांना दवाखान्यात नेलं का??अजून काही उपचार होऊ शकतो का??मी काही मदत करू का?? एका क्षणात सारं बदललं.

खरी परिस्थिती समजली की आपले अनेक समज गळून पडतात. आपली वृत्ती अनेकदा आपल्या काही गृहितकांवर अवलंबून असते. ही लोकं सुधारणार नाहीत, यांना शिक्षणाचं महत्व नाही,हे मी अनेक वर्षे बाळगलेल गृहीतक होतं.अशी अनेक गृहीतके आपण मनात बाळगत असतो.

जर आपल्याला आपल्यात मोठा आमूलाग्र बदल घडवायचा असेल, तर आपल्या गृहितकांवर आपल्याला काम करावं लागेल.आपली वृत्ती, वर्तणूक यावर काम करण्यापेक्षा, ज्यातून आपल्या वृत्ती आणि वर्तणूक बनतात, त्या धारणेवर काम करणं हे आपण जेव्हा करू तेव्हाच आपल्या जीवनात प्रचंड सुधारणा आपल्याला साध्य होतील.

तेव्हा याबाबतीत स्वत: स्वत:शीच सातत्याने बोलत राहू या...!!

(लेखन प्रेरणा-अतिपरिणामकारक लोकांच्या ७ सवयी, लेखक-स्टीफन आर. कवी)

**(विनायक सावळे हे प्राथमिक शिक्षक असून शहादा जि.नंदुरबार येथे कार्यरत आहेत. )**

## ऑन-ऑफ 'शिक्षण'

-संदेश नंदकिशोर हजारे


**आम्ही शिक्षक गावात फिरत असतांना अनेक पालक शाळा उघडणार का? असे विचारत. शाळा सुरू केली तर मुलांना पाठवणार का? हा प्रश्न विचारला तर काही पालकांनी हो म्हटले तर काहींनी नाही. परंतु गावातील बहुसंख्य मुले मात्र शालेय आवारातच खेळतांना दिसली. गावात मुलांना खेळायला शाळेचे मैदानच असल्याने कोरोनाची भिती न बाळगता व कोणतीही काळजी न घेता शालेय आवारातच खेळणाऱ्या मुलांना शाळा सुरू झालेली आवडणारच मात्र शासनाच्या स्पष्ट सुचना नसतांना ऑनलाईन शिक्षणावरच भर द्यावा असे आम्हा शिक्षकांचे मत. तसेच पालकवर्गाला ऑनलाईन शिक्षण मोबाईलवर सुरू झालेय हे देखील माहित आहे. मात्र मोबाईलपेक्षा शाळाच बरी असे सांगणारे पालक मुले दिवसभर घरात राहुन कसा त्रास देतात याचा पाढा वाचून मोबाईल तर नकोच हे आग्रहाने सांगत होते.**



नितीन नंदाप्रभू केवटे
त्र्यंबकेश्वर-नाशिक
७२१८६०१५१०

# मोबाईल करा पालक नियंत्रित!

१) **Play Store सेटिंग**



मित्रांनो सध्या सर्वत्र मुलांना मोबाईलवरून अभ्यास दिला जातो आहे. काळाची पावले व बदलणारे आधुनिक जग बघीं शिक्षणात तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे अनिवार्य झाले आहे. जे पालक मुलांना मोबाईल हाताळायला देण्यास टाळाटाळ करत होते आज मुलांच्या हातात मोबाईल देणे नाईलाजाने का होईना पण अत्यावश्यक झाले आहे अशीच सर्वत्र परिस्थिती आहे. मुलांना अभ्यासाला मोबाईल दिला तरी मुलं आपलं थोडस दूर्लक्ष झालं तरी मोबाईलवर गेम खेळणे हे कृत्य करत असतात. या परिस्थितीत पालकांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवू शकतात. मुलांना गेम खेळतांना मध्येमध्ये येणाऱ्या घाणेरड्या जाहिराती व नको त्या ॲपचे डाउनलोड करणे थांबवता येऊ शकते त्यासाठी प्ले स्टोअरवर एक छोटीशी सेटिंग करावी लागते. आपल्या मोबाईलमध्ये असलेले प्लेस्टोअर उघडा - डावीकडच्या वरच्याकोपऱ्यात असलेल्या तीन आडव्या रेषा आहेत त्यावर क्लिक करा- खाली आठव्या क्रमांकावर सेटिंग हा पर्याय क्लिक करा parental controls हा पर्याय of दिसेल तो on असायला हवा. त्यासाठी त्यावर क्लिक- parental controls are off यापुढील स्क्रोल उजवीकडे सरकवा-create content pin अशी नवी विंडो उघडेल यात चार अंकी लक्षात राहील असा पीन टाका . Confirm pin म्हणून परत तोच पिन क्रमांक टाका ok वरती बघा जिथे ऑफ होते तिथे ऑन झालेले दिसेल. आता खाली ॲप व गेम यावर क्लिक -rated 3+ Vo allow all पर्यंत पर्याय आहेत हे पर्याय म्हणजे आपल्या पाल्यांचा वयोगट. आपली मुलं ज्या वयोगटात मोडतात तिथं क्लिक करा. एकापेक्षा अधिक मुलं असतील तर मोठा ज्या वयोगटाचा तो वयोगट निवडा व खाली सेव्ह वर क्लिक करा. ही सेटिंग मुलांच्या नकळत करा त्यांना पिनकळता कामा नये. आता येणारे प्रत्येकॲपव जाहिरात ही मुलांच्या वयोगटाला अनुसरून येणार.

२) **YOU TUBE KIDS** मुलांसाठी स्वतंत्रयुट्यूब ॲप्लिकेशन

मुलांना अभ्यासाला मोबाईल दिला तर युट्युब उघडून वेगवेगळे व्हिडियो बघत असतात. युट्यूबवर सर्व वयोगटातील व असंख्य विषयावर व्हिडिओ उपलब्ध आहेत. यातील काही व्हिडिओ बालमनावर प्रतिकूल परिणाम करणारे पण असतात. यासाठी युट्यूब चे खास मुलांसाठी तयार केलेले ॲप्लिकेशन **You tube Kids** हे अप प्लेस्टोअर वरून मोफत डाऊन लोड करण्यासाठी उपलब्ध आहे.ॲपडाउनलोड केल्यावर त्यात **parent control** फंक्शन आहे यावरून आपले पाल्यज्या वयोगटातील आहे तो वयोगट निवड ता येतो व तिथे उपलब्ध असलेले विविध श्रेणीतील व्हिडिओ प्रकार यातील कोणता प्रकार हा आपल्या पाल्यास बघायला हवा सुद्धा सेट करता येते. त्यानंतर मुलांना बिनधास्त युट्युब बघू द्या त्यात मुलांच्या ज्ञान व मनोरंजनासाठी प्रचंड प्रमाणात व्हिडिओ उपलब्ध आहेत.

या ॲपची लिंक खाली दिलेली आहे. **https:// play. google. com/store/ apps/ details?id =com. google. android apps. youtu be.kids**

**(नितीन केवटे हे शासकीय आश्रमशाळा तोरंगण ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे कार्यरत आहेत.)**



# वटवाघूळ

**डॉ.नंदा हरम**
विज्ञान प्रसारक,पुणे
९३७२९१०३०६


महेश आज त्याच्या मित्राकडे, विकासकडे आला होता. विकास विद्यापीठाच्या प्राध्यापकांच्या वसाहतीत रहात होता. विद्या-पीठाच्या आवारात भरपूर झाडं होती. त्यामुळे सकाळी दोघंही फेरफटका मारायला निघाले. एके ठिकाणी फिरत असताना पक्ष्यांचा जोरदार आवाज आला. महेश कुतुहलाने बघू लागला. झाडाला पिशव्या टांगाव्या. असं काहीतरी दिसत होतं. (आकृती क्र.१ पहा.)



महेशची प्रश्नार्थक मुद्रा बघून विकास म्हणाला, ''अरे, ती वटवाघंळ आहेत.'' महेश म्हणाला, ''एवढी!'' विकास म्हणाला, ''अरे, शेकडोनी आहेत. दिवसभर ती अशी खाली डोकं, वर पाय अशा टांगलेल्या अवस्थेत असतात. संध्याकाळी ती सगळी अन्न शोधायला बाहेर पडतात.'' ''ओ...म्हणजे निशाचर ना?'', असं महेशने म्हणताच विकास म्हणाला, ''बरोबर! रात्रभर ती बाहेर असतात आणि आता सकाळची परत येतात. प्रत्येकजण आपापली जागा शोधताहेत, म्हणून एवढा आवाज.....'' एवढ्यात विकासच्या एका मित्राने हाक मारली. विकास तिकडे गेल्यावर महेशचं निरीक्षण चालूच होतं. विकास आपल्या त्या मित्राशी गप्पा मारून परत आला.

महेश वटवाघळांची माहिती विचारू लागला. तेव्हा विकास म्हणाला,''चल, घरी. जाऊ. मी, या वटवाघळांची माहिती गोळा केली आहे, त्याचं प्रेझेंटेशन तयार केलं आहे.''

घरी गेल्यावर खाणं-पिणं झालं आणि महेशने विकासला ते प्रेझेंटेशन दाखव, म्हणून आग्रह करू लागला. महेश म्हणाला. ''विकास, ही वटवाघंळ सस्तन असून, एकमेव आहेत की ज्यांना चांगलं उडता येतं ना?'' विकास मान हलवत म्हणाला, '' हो महेश. त्यांचे पुढचे जे दोन पाय आहेत ना, त्याचं पंखात रूपांतर झालंय. आणि विशेष म्हणजे त्यांची उडण्याची क्षमता पक्ष्यांपेक्षाही चांगली असते. दोघांच्या पंखांच्या रचनेतच खूप फरक आहे.'' ''विकास सांग ना, काय फरक आहे ना?'' महेशने असं म्हणताच विकासने त्याला प्रेझेंटेशनची एक स्लाइड (आकृती क्र.२ पहा)





दाखवली. विकास सांगायला लागला,'' हे बघ,

चा आकृतीत स्पष्ट दिसतंय, पक्ष्यांच्या पंखांमध्ये पिसं असतात. त्यांच्या हाताची लांबी जास्त असते अन् एकच बोट असतं. पण वटवाघळाच्या तीन बोटांवर त्वचेचं ताणलेलं पटल असतं. पटकन बघताना पंखांचा आकार सारखाच वाटतो, पण उडतानाची त्याची वैशिष्ट्यं वेगळी आहेत.'' महेश उत्सकतेने म्हणाला, ''ती कोणती?'' विकास म्हणाला, उडताना वटवाघळांची बोटं वाकू शकतात, त्यामुळे त्यांच्या पंखांचा आकार बदलू शकतो. पक्ष्यांच्या पंखामध्ये असे सांधे नसल्यामुळे त्यांना ही क्रिया करता येत नाही.'' ''वटवाघळाच्या पंखात किती सांधे असतात!'' ''दोन डझनापेक्षा अधिक सांधे असतात. सांध्यांमुळे लवचिक पणा येतो. तुला आश्चर्य वाटेल, त्यांची हाडंही लवचिक असतात.'' '' ते कस काय?'' महेशने शंका विचारली. विकास म्हणाला. ''त्यांच्या अन्नात कॅल्शिअमची कमतरता असते. त्यामुळे उडताना ते हाडांचा आकार बदलू शकतात.''

''आणखीही काही फरक असतील ना, ज्यांच्यामुळे वटवाघळांच्या उडव्याची क्षमता जास्त चांगली असते!''महेशने असे विचारताच विकास उत्तरला. ''हो ना.... पक्षी जेव्हां आकाशात झेपावतात, तेव्हां त्यांच्या पंखांच्या कडेला असलेली पिस ते फिरवतात, ज्यांमुळे पिसांच्यामधून हवा निघून जाते आणि तिचा प्रतिरोध कमी होतो. वटवाघळाचं पटल असल्यामुळे असं काही ते करू शकत नाहीत. पण या पटलामध्ये स्नायूंच्या बारीक रेघा तुला गेलेल्या दिसतील (आकृती क्र.२), हे स्नायू त्यांना हवे असतील तेव्हां ताठर किंवा कडक करतात नाहीतर सैलावतात. थोडक्यात, गरजेप्रमाणे त्या पटलाचा आकार बदलू शकतात. त्यामुळेच हवेत झेपावताना स्नायू शिथील करून हवेचा प्रतिरोध कमी करतात तर खाली येताना, स्नायू ताठर ठेवतात. त्याचमुळे ते त्यांच्या पंखांचा कोन ही बदलू शकतात.'' ''अरे,.. प्रेझेंटेशन करायचं म्हटलं की खूप अभ्यास करावा लागतो.''

ङ्ग''विकास, असं एखादं वैशिष्ट्य आहे का की जे साधारण-पणे विशेषकोणाला माहित नसतं!'' असं महेशने म्हणातांच विकास म्हणाला. '' मी येणारच होतो, त्या मुद्दयाकडे. वटवाघळांच्या पखांच्या पृष्ठभागावर सूक्ष्म असे केस असतात (आकृती क्र.३ पहा).




**आकृती क्र.३ः पंखावरील केसाचे अतिसूक्ष्मदर्शकाने काढलेले छायाचित्र**

ङ्ग' केस...?'' चकित होऊन महेश उद्गारला. विकास म्हणाला, '' पंखांवरती दोन प्रकारचे केस असतात. एका प्रकारचे केस असतात. जे त्यांच्या शरीरावर इतर भागात असतात, तसे. पण दुसऱ्या प्रकारचे केस मात्र वेगळे असतात.''म्हणजे नेमकं काय? विकास पुढे सांगू लागला,'' हे केस डोळ्यांना न दिसण्याइतके सूक्ष्म असतात आणि ते पूर्ण पंखाला आच्छादित करतात. त्यांची लांबी अर्ध्या मिलीमीटरपेक्षा कमी असते आणि त्यांच्या टोकाला असलेली रूंदी मायक्रोमीटरपेक्षाही कमी असते. (१००० मायक्रोमीटर=१ मिलीमीटर). त्यांची सूक्ष्मता येत्येत का लक्षात? आपल्या एका केसात १० ते ३०० केसांचा जुडगा राहील, इतके सूक्ष्म. या केसांच्या तळाशी स्पर्श ग्रहण करणारं 'मरकेल' नावाचं केंद्र असतं. ही ग्रहणकेंद्र हवेच्या गतीची माहिती मेंदूकडे पोहोचवते. त्यामुळे उडताना त्याची मदत होते. पंखाच्या पुढच्या भागावरील केसांना पुढून आत येणाऱ्या हवेची गती कळते, तर मागच्या भागावरील केस मागून येणाऱ्या हवेला प्रतिसाद देतात. थोडक्यात काय तर या केसांच्या

संवेदनशीलतेमुळे वटवाघळाला हवेतील क्षुब्धता व्यवस्थित जाणवते. त्यामुळे वटवाघूळ कशावरही आपटत नाही. या केसांतील ग्रहण केंद्रांमुळेच ते उडताना हवी तशी तशी आणि वेळा बदलू शकतात.''

'विकास, मी प्रथमच या केसांविषयी ऐकलं. पण ही वट-वाघळं स्वनातीत ध्वनीचा ultrasonic sound भक्ष्य शोधव्या-करिता, तसेच उडताना कुठे आपटू नये, म्हणून उपयोग करतात. असं ऐकलं होतं,'' महेश विचारू लागला. विकास म्हणाला,'' बरोबर आहे, तुझं म्हणणें.पूर्वी असा समज होता की केवळ स्वनातील ध्वनी-चाच उपयोग केला जातो. मात्र हल्लीच्या संशोधनावरून पंखांवरील केसांची माहिती उपलब्ध झाली.'' ''विकास, प्रतिध्वनीवरून भक्ष्य कुठे आहे, हे त्याला कसं कळतं? '' महेश, ध्वनी निर्माण करण्याच्या वेगवेगळ्या पध्दती आहेत. काही वटवाघळांची स्वरमंत्रं आकुंचन पावतात, तर काही जातींमध्ये जीभेच्या सहाय्याने आवाज काढला जातो. हा आवाज तोंडातून बाहेर पडतो. तर काही विशिष्ट जातीच्या वटवाघळांमध्ये हा आवाज त्यांच्या नाकपुड्यांतून बाहेर टाकला जातो. ''ऐकावे ते नवलच, विकास! या नाक पुड्यांमध्ये काही विशिष्ट रचना असते का? या '' हो नाकपुड्यांत घोड्याच्या नाली प्रमाणे मांसल भाग असतो. जो एखाद्या कर्ण्यासारखं काम करतो. या आवाजाची वारंवारिता २० ते २०० किलोहर्टझ एवढी असते. या आवाजाची वारंवाारिता, त्याची तीव्रता (डेसिबल्स)आणि त्याचा कालावधी (मिलिसेकंद) हा वैशिष्ट्यपूर्ण असतो.'' साधारण या आवाजाची काय तीव्रता असते?'' महेश कमीत कमी ५० डेसिबल्स आणि १२० डेसिबल्स इतका तीव्र आवाज ते काढू शकताते.''

'' या आवाजाचा त्यांनाही त्रास होत असेल ना?'' महेशने शंका काढली, ''पण त्यांकरिता योजना आहे. बरंका! वटवाघळं जेव्हा एवढा तीव्र आवाज काढतात, तेव्हा त्यांच्या मध्य-कर्णाचा स्नायू आकुंचन पावतो ज्यामुळे त्यातली तीन हाडं विलग होतात. थोडक्यात, त्यांची ऐकण्याची संवेदनशीलता कमी झालेली असते. स्वरयंत्राच्या स्नायूचं आकुंचन होऊन आवाज बाहेर पडण्या-पूर्वी ६ मिलीसेकंद आधी हा मध्यमकर्णातला स्नायू आकुंचन पावतो.'' ''पण मग, त्यांना भक्ष्यावर हा आवाज आपटून निर्माण झालेला प्रतिध्वनी कसा ऐकू येणार?''महेशला प्रश्न पडला. विकास म्हणाला.'' अरे, तो मध्यकर्णाचा स्नायू २ ते ८ मिनिसेकंदां-नंतर लगेच प्रसरण पावतो. साधारण१ मीटर अंतरावर असलेल्या भक्ष्याकडून प्रतिध्वनी यायला ६ मिलिसेकंद लागतात.'' व्वा! काय अचूक काम चालंत नाही?'' ''हे बघ, या आकृतीत (क्र.४ पहा)



आकृती क्र.४

वटवाघळांनी काढलेला आवाज आणि निर्माण होणारा प्रतिध्वनी, याचं तत्व दाखविले आहे.''

''विकास, प्रतिध्वनीच्या सहाय्याने ही वटवाघळं आपलं भक्ष्य शोधतात, म्हणजे यांची दृष्टी चांगली नसते का?''

''तुझा तर्क बरोबर आहे, महेश. बऱ्याचशा जातीच्या वटवाघळांचे डोळे अगदी लहान आणि विशेष विकसित झालेले नसतात. अर्थात, ते आंधळे नसतात.

काही जातीच्या वटवाघळांची दृष्टी साधारण आपल्यासारखी असते.''

''विकास, त्यांच्या शरीराचं तापमान कसं असतं रे?''

ङ्ग'महेश, थोड्या जातीची वटवाघळं आहेत ना, त्यांच्या शरीराचं तापमान बदलतं असतं, पण बऱ्याचशा वटवाघळांच्या शरीराचं तापमान स्थिर असतं. इतर सस्तन प्राण्यांच्या तुलनेत, तापमान स्थिर असतं. इतर सस्तन प्राण्यांच्या तुलनेत, ते उष्णता वाहक असतात. त्यांच्या पंखात रक्तवाहिन्या असतात. पंख तेव्हा पसरलेले असतात, तेव्हां त्यांच्या शरीराची उष्णता कमी होते. जेव्हां झाडाला टांगलेल्या अवस्थेत असतात, तेव्हां ते पंख शरीराभोवती गुंडाळून घेतात. तेव्हां गरम हवेचा थरच आत घेतला जातो.''

' ङ्गविकास, आज प्रथमच मला वटवाघळांविषयी एवढी माहिती मिळाली. मजा आली.''

''अरे हो, महेश! जाता-जाता एक सांगतो. बेडकांच्या बाबतीत शीतनिद्रा तू ऐकली असशील ना?''

तसेच ही वटवाघळंही निष्क्रीय अवस्थेत जातात. साधारण थंड प्रदेशात जेव्हां अन्नाची म्हणजे कीटकांचा अभाव असतो, तेव्हां ऑक्टो-नोव्हें. महिन्यात वटवाघळं या निष्क्रीय अवस्थेत शिरतात. मार्च महिन्यात ते या अवस्थेतून बाहेर येतात. वटवाघळांची जिथे वस्ती असते, तेथील वातारवणाप्रमाणे या अवस्थेचा कालवधी बदलतो.''

''विकास...या निष्क्रीय अवस्थेचा नेमका फायदा काय?'' '' महेश, भक्ष्य पकडण्याकरिता बरीच ऊर्जा खर्च करावी लागते. तुला म्हटलं ना की अन्नाचं दुर्भिक्ष्य असतं. त्यामुळे निष्क्रीय अवस्था धारण केली की ऊर्जेची बचत होते. या अवस्थेत त्यांचे हृदयाचे ठोके मिनिटाला फक्त १० असतात, जे सर्वसाधारण अवस्थेत मिनिटाला २०० ते ३०० असतात. त्यांच्या शरीराचं तापमान ही ६-३० सेंटिग्रेड इतकं खाली येतं.''

''बाप रे! काय कमाल आहे ना! वातावरणाशी कसं जुळवून घेतात ना!''

एवढ्यात विकासची आई त्यांना जेवणाकरिता हाका मारू लागली. विकास म्हणाला, ''महेश, वटवाघळांचं जे वेगळेपण होतं, ते मुख्यत: मी तुला सांगितलं. बाकीची माहिती करशील ना गोळा?'' महेश म्हणाला,'' हो हो... करेन ना. ती माहिती मिळवतांना नवीन काही दृष्टिस पडलं, तर मी पण 'प्रेझेंटेशन' तयार करेन. मित्रा, मनापासून धन्यवाद!''

''धन्यवाद कसले?'', मजा आली...., चल जेवायला जाऊ. आई वाट बघंत असेल., '' असं म्हणत विकास आणि महेश स्वयंपाक-घरात गेले.

## ऑन-ऑफ 'शिक्षण'

-संदेश नंदकिशोर हजारे

**ऑन लाईन शिक्षण देवून पाहू या. याच उत्सुकतेपोटी आम्ही शिक्षक गावात मुलांच्या घरोघरी गेलो. तेव्हा आलेले अनुभव पहाता गोरगरीब वंचित बहुसंख्य पालकांकडे मोबाईल आहेत. परंतु त्यातील काहीच ॲन्ड्राईड आहेत. बाकी सारे जिओ वा इतर कंपन्यांचे. काही पालकांकडे ॲन्ड्राईड असला तरी त्यावर कर्त्या पुरूषाची मक्तेदारी. तो कामाला गेला की मोबाईल घेऊन जाणार. घरात एकच मोबाईल. दुसरा असला तरी तो साधा. मग त्यावर ना व्हॉटसअॅप ना युट्युब. आता करायचे तरी काय? मजुरी करून वडील रात्रीच घरी येणार तेव्हा मुले झोपी गेलेली असणार. मग आजचा दिलेला अभ्यास हा उद्यावर ढकलला जाईल किंवा पालक मोबाईल दाखवायचेच विसरले किंवा पैशांअभावी नेटचे रिचार्ज संपलेले असणार, अशा अनंत ऑनलाईनच्या अडचणी पहाता मुलांचा ऑनलाईन शिक्षणाचा नक्कीच शंख वाजणार.**

कोरोनाला हरवू या !



**विशाल परदेशी**
धुळे
८२७५५९२९९५

# शहाणे व्हा...!

निसर्ग निर्मित असलेली हि सजीव सुष्टी सध्या आपले अस्तित्व शोधतांना दिसत आहे.अनेक शोध-संशोधन करून जगाला या कोरोना नामक विषाणूवर पर्याय अजून सापडत नाही.कोरोनाच्या या भयंकर वादळाला शांत करण्यासाठी प्रत्येकाला शहाणं व्हावे लागेल.

सध्या जे कोरोनाचं चक्रीवादळ प्रचंड वेगाने वाहतयं... भल्याभल्यांची पाचावर धारण बसवतयं... कित्येकांना तर आपल्यातून समोरच उचलतयं... त्याचा वेग आता फक्त घातकी वा विध्वंसक च नव्हे तर आत्मघातकी वा अतिविध्वंसक झालाय... तो वरचेवर वाढतोच आहे...(अलबतच हे पुढील काळात लवकरच लक्षात येईल पण तेव्हा पुलाखालून जायला नको एवढं पाणी मात्र वाहून गेलेलं असेल.) आज आपण कोरोनाग्रस्तांची, त्यांच्या घरच्या लोकांची, कुटुंबियांची काय , कशी अवस्था-व्यवस्था, व्यथा, घालमेल असेल वा आहे हे पुन्हा पुन्हा समोर सताड उघड्या डोळ्यांनी स्पष्ट दिसत असून, पाहून, वाचूनही मनाने जाणीवपूर्वक समजून घ्यायलाच तयार नाही आहोत. (सर्व काही माहित असूनही आपण जाणीवपूर्वक गांधारीसारखी डोळ्यांवर पट्टी बांधून घेतली असली तरी नेमकं पुत्राला वाचवण्यावेळी तिने सोडलेली पट्टी फोलच ठरली होती. वरदान वायाच गेलं. अखेर पुत्र जीवानिशी गेलाच ना.) विशेषतः हा 'ग्रस्तरूपींचा' आकडा प्रचंड वाढत असूनही कोरोनावर विनोद करणं हे तर हळूहळू एक राष्ट्रीय कौशल्यच होऊ पहात आहे. एक राष्ट्राचा जबाबदार नागरिक म्हणून हा निव्वळ निर्लज्जपणाच नव्हे काय? ( तर येथे कोरोनाग्रस्तांबाबतच्या आपल्या समानानुभूतीचा प्रश्न येतोच कोठे? देशावरचं आलेल महासंकट ही आपण हसण्यावर नेतो हा तर शुद्ध बालिशपणा...! ) आपलं देशाप्रतीचं प्रथम कर्तव्य आपण निभावलच पाहिजे.

बलवान प्यशक्तोऽसौ धनवानपि निर्धनः !
श्रुतवानपि मूर्खो सौ यो धर्मविमुखो जनः !

(अर्थात - जो व्यक्ति अपने-परम-कर्तव्य से विमुख हो जाता है वह व्यक्ति बलवान होने पर भी असमर्थ, धनवान होने पर भी निर्धन व ज्ञानी होने पर भी मुर्ख होता है)

एक तर अशा वेळी आपलं स्वतःहून शहाणपणयुक्त असं अपेक्षित वागणं खूपच कमी होताना दिसतेय (असं झालं की जुनेजाणते लोक म्हणतात - याची पायली भरत आली). आणि दुसरं म्हणजे आपण स्वतःशी सुद्धा चांगल्यापैकी अप्रामाणिक झालो आहेत. (याची जणू सवय होऊन ते एवढं अंगवळणी पडलेय की आता तर स्वतःचं सुद्धा मरण कळेनासं झालयं. ही सुद्धा वैचारिक पातळीवरील जीवघेणी व्यसनाधिनताच म्हणायची) कारण किती ही कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवला तरी ही आपल्यापैकी कोण केव्हा आणि कोणतं कारण सांगून वा कोणती पळवाट काढून कोठे जाऊन फिरून येईल याची खात्रीच राहिलेली नाही. यानिमित्ताने सध्या अत्यावश्यक अशा प्रामाणिक राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव आपणास भोवतोय हे नक्की. (दिवसभरांत stay home, stay safe चे किमान ५०/१०० मेसेज पाठवणारे सुद्धा बाहेर फेरफटका मारायला जात आहेत..) यातून फक्त आपणच गोत्यात येणार आहोत असं नव्हे तर आपल्या

कुटुंबालाही यात ओढून घेणार आहोत. नेमकं आपण कोणाला फसवतोय याचं ही भान आता आपल्याला नसावं का? क्षुल्लक गोष्टींसाठी आपल्या अख्ख्या घरादाराचा जीव टांगणीला लावून ठेवण्यात कोणता शहाणपणाय? आता च खरं शहाणपण (आजपर्यंत बौद्धिक खात्यावर जमा झालेलं असेल तेवढं तरी) आपल्या खात्यावरून काढून वापरण्याची ही च वेळ आहे. पुन्हा ते वापरता येणं अशक्यप्रायः आहे. त्यामुळं आता या कोरोना वादळाला शांत करण्यासाठी प्रत्येकाला शहाणं व्हावे लागेल..? अशी आर्त विनवणी करणारी साद घालण्याची वेळ आलीय.. ते शक्य तेवढं करतोचय. सध्या तरी कोरोनावर कोणतेच औषध वा लस नाही व लवकर येण्याची शक्यता ही नाही. फक्त उत्तम रोगप्रतिकारशक्ती व आपलं नशीब (प्रारब्ध) या दोन च बाबी आहेत. यांपैकी एक आपल्या हाती आहे पण प्रारब्ध (केलेल्या चुका/घोडचुका) आपला पिच्छा का अन् कसा सोडेल?

तरी सुद्धा आपण अतिशहाणपणानं (म्हणजे स्वतःच्या तुटपुंज्या शहाणपणानं) च वागत आहोत. आपण हे जाणतो की

अति सर्वत्र वर्जयेता।

आपण शहाणं होणार आहोत तरी केव्हा?? कोरोनाच्या कुशीमध्ये निपचितपणे कायमचं थंड पहुडल्यावरच का?? आताच संधी आहे जिवंत रहाता यावं म्हणून धडपडण्याची. पुन्हा ना जमीन पुरेल ना आसमान.. आपण करीत असलेल्या चुका म्हणजे थेट विधात्याला च मिसकॉल देण्यासारखे आहे. आपले एवढे मिसकॉल पाहून त्याने कॉल केला तर ते कोणत्या भावात पडेल?? आता तरी स्वतःशी प्रामाणिक रहाणं व शहाणपणाणं वागणं आवश्यक आहे. अर्थात जिवंत राहण्याची इच्छा असेल तरच..! अन्यथा आपल्या बेदरकार अतिशहाणपणामुळं आपल्याच घरांचीही स्मशानभूमी व्हायला फारसा वेळ लागणार नाही हे लक्षातच ठेवावं... कारण असं यापूर्वीच्या विविध महामारींमध्ये जगातील अनेक देशांमधाये घडलेलं आहे. त्यातही आपल्याकडे अगदी तारूण्यात पदार्पण केलेल्यांपासूनच व्यसनाधीनता व बेफिकीरीची वृत्ती कमालीची आहे. त्यामुळं रोगप्रतिकारशक्ती उत्तम असणारे तुलनेत दुर्दैवाने फारच कमी प्रमाणात आहेत. हा च सर्वांत मोठा धोका आहे. आपण सर्वजण च हे कटू सत्य जाणून आहोत. यापूर्वीचा इतिहास पहाता सध्याची परिस्थिती फारशी वेगळी नाही. शत्रूला कमकुवत समजण्याच्या चुकीतून वा नादानपणातूनच कित्येक महान मुलूख , साम्राज्ये नेस्तनाबूत झालीत.. नष्ट झालीत. हा इतिहास आहे. (ज्या राष्ट्रांनी कोरोनाला हलक्यातच घेतलं त्या राष्ट्रांना कोरोनाने चांगलच हलकं करून टाकलयं. म्हणून कोरोनाला नीट ओळखा आता तरी...) 'ज्यांना इतिहासातून काहीच बोध/ धडा घेऊन सुधारण्याची इच्छाच नाही त्यांना स्वतः इतिहासच ' पद्धतशीरपणे धडा शिकवून इतिहासजमा केल्याशिवाय रहात नाही ' हा सुद्धा आजपर्यंतचा इतिहासच आहे बरं का...! म्हणून आता या सर्व गोष्टींची जाणीव ठेवून शहाणपणानं वागेलं तो च फक्त जगेल. यात तिळमात्र शंकाच नाही. रहायचं की जायचं ते आपलं आपणच पहावं.या भयंकर महामारीत जो शहाणा होऊन स्वतःचे बरोबरचं कुटुंबाचे रक्षण करेल तोच या आधुनिक जगाचा साक्षीदार ठरणार आहे..

**(विशाल परदेशी हे प्राथमिक शिक्षक असून जिल्हा परिषद शिरधाने प्रा.ता.जि.धुळे येथे कार्यरत आहेत.)**

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक –शैला नंदकिशोर हजारे Reg No.



# महुची फुले

**प्रा.रमेश पावरा**
शिरपूर जि.धुळे
००००

'कोरोना' या आजार पसरु नये म्हणुन शासनाने सर्वत्र लॉकडॉऊन चा निर्णय घेतला.त्यामुळे शाळा महाविद्यालये ओस पडली.त्यामुळे सर्व शिक्षक, प्राध्यापक घरीच आहे. सर्वत्र लोकडाऊन असल्याने घरात थांबावे लागते आहेस.यात शेतीची कामे वगळता सर्वत्र बंदी आहेस.व ते आपल्या स्वत:साठी व देशाच्या सुरक्षेसाठी योग्य ही आहेस. सध्या गावाकडे आपल्या शेतावरच ठाण मांडुन वास्तव्यास असलेले मी मात्र लॉकडाऊनची संधी करून नवीन छंद जोपासला. तो म्हणजे महुचे फुल बांधावर जाऊन गोळा करणे.जणु मोहात पडावे असे मोहाचे झाड. फांद्यांच्या टोकास झुपक्याने आलेली पिवळ्यामातकट रंगाची मोहाची फुले. लहानपणापासुनच महुची फुले गोळा करायचा छंद आहेच परंतु नोकरी निमित्त बाहेरगावी असल्याने पुर्ण करता आलं नाही. मात्र लॉकडाऊनच्या काळात शेतावरच थाट मांडल्याने मला छंद जोपासता आला. आदिवासी पट्टय़ात मोहाचे झाड वा फुलं यासाठी 'महु'हा शब्द प्रचलित आहे. सध्या मोह फुलांचा बहर ओसरला आहेस.त्याच कळीतून टोळंबी नामक फळ आकाराला येवू लागले आहे. स्वताच्या शेताच्या बांधावर त्यांनी असंख्य महुझाडांची लागवड केली आहे. हे झाड सुमारे दहा-पंधरा वर्षांचे झाल्यानंतर त्याला फुलांचा बहर यायला सुरुवात होते. साधारणत: मार्च महिन्यात या झाडाची पाने परिपक्व होवून गळून पडतात. दररोज टोपली दोन टोपली फुलं वेचून गोळा करणे, ती शेतातील माळ्यावर वाळत घालणे ही कामे पूर्ण केली जातात. फुलांप्रमाणेच टोळंबीचं बी देखील वेचणे, गोळा करणे आणि माळ्यावर सुरक्षित ठेवणे ही कामे करतांना प्राध्यापक पणा दूर ठेवला. त्याने जवळपास दोन क्विंटल फुले गोळा करुन वाळवली आहे. या मोह फुलांपासुन सेनिटायझरही बनविले . टोळंबीच्या बियांपासून काढलेल्या तेलाचा खाद्यतेल म्हणून उपयोग केला जातो. त्यापासून निघालेली ढेप याचाही वापर जनावरांना खाद्य म्हणून होतो. औषधी गुणधर्म असलेल्या टोळंबीच्या तेलाचाही औषध म्हणून वापर केला जातो. आदिवासी समाजात



मोह फुलाला अन्नाचा दर्जा आहे. ही फुलं भाजल्यावर त्यापासून चटणी तयार केली जाते. त्यात अन्य कडधान्याचा वापर केल्यास पोषक आहार म्हणून त्याचा वापर होतो. मोहाच्या फळांचे पुरण फार चविष्ट असते. हंगामात ही फुलं जमवतात आणि सुकवून साठवुन ठेवली जाते. डोंगरदऱ्यातील आदिवासींसाठी पोटाची खळगी भरण्याचे एक प्रमुख साधन म्हणून मोहाच्या झाडाला अनन्यसाधारण महत्व आहे.ही फुल गोळा करता करता दिवस कसा जातो ते देखील कळत नाही.

# शिक्षणयात्री मासिकाच्या वतीने वाढदिवसाच्या लाख-लाख शुभेच्छा !


राहुल दंदे
११जुलै


गिरीष बोरसे
२८ जुलै


संतोष जाधव
१ जुलै


महेंद्र महाजन
८ जुलै


नूरबेग मिर्झा
३ जुलै


युवराज माने
१० जुलै


गोपाल चौधरी
२९ जुलै


जुबेर काझी
१५ जुलै


मंगला पाटील
१३ जुलै


मधुकर पाटील
२५ जुलै


किरण ढिवरे
१७ जुलै


विठ्ठल काळे
२३ जुलै


विनोद राठोड
४ जुलै


तेरसिंग पावरा
८ जुलै


श्याम मुंडे
१२ जुलै

## शिक्षणयात्री सुवर्ण पान योजना...

वर्गणीदारांसाठी सुवर्ण संधी आपला जन्मदिवस,मिळविलेले यश, स्तृत्य निवड शिक्षणयात्री सन्मान पानावर प्रकाशित होईल या संदर्भात नाव/फोटो,तपशिल संपर्क क्रमांक कळविणे आवश्यक.

9850964601 email:shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226


शिक्षण यात्री

Postal Registration No.DHL/557/2018-20










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ५०० रूपये    द्विवार्षिक वर्गणी - १००० रूपये    त्रैवार्षिक वर्गणी-१५०० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

विजया बँक (राष्ट्रीय कृत) No--512700301000129 Ifsc-VIJB0005127

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2018-20

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................
..........................................................
..........................................................

Pragati Arts Shirpur 8421356261